बातम्या, लेख
व जाहिरातीसाठी
लातूर समाचार
समर्थनगर धाराशिव
मो.९४२२४७२५०२
व ९१७२३२५७०८

। धाराशिव । वर्ष २५ वे । अंक १०० वा । मंगळवार दिनांक २४ जून, २०२५ । पृष्ठे ६ । किंमत १.५० ₹
RNI MAHMAR/2003/11649

# लातूर समाचार

प्रकाशन: धाराशिव (उस्मानाबाद आवृत्ती)
(सांज दैनिक) पोष्ट परवाना
L2/RNP/OMD- 52/24-26
संस्थापक : स्व. शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक)
dainiklatursamachar@gmail.com

प्रियंका
ढाबा हॉटेल
गड पाटी जवळ
धाराशिव.
रूचकर भोजनासाठी
भेट द्या

## क्राईम न्युज

### शस्त्र कायद्यांतर्गतगुन्हा नोंद

तुळजापूर (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत नामे-सहदेव वय ३१ वर्षे, रा. तिर्थ खुर्द ता. तुळजापूर जि. धाराशिव यांनी दि.२२.०६.२०२५ रोजी सावरकर चौक तुळजापूर येथे लोकांच्या जिवीतास धोका निर्माण होईल असे स्टिल धातुचा चाकु अंदाजे ५०० किंमतीचा विनापरवाना बेकायदेशीर रित्या स्वत:चे जवळ बाळगलेला तुळजापूर पोलीसांना मिळून आला. यावर पथकाने नमुद चाकु जप्त करुन फिर्यादी नामे-वैभव नामदेव देशमुख पोलीस नाईक नेमणुक पोलीस ठाणे तुळजापूर यांनी दिलेल्या प्रथम खबरेवरुन शस्त्र कायदा कलम- ४, २५ अन्वये तुळजापूर पो. ठाणे येथे गुन्हा नोंदवला आहे.

### साबणाचे १४ बॉक्सची चोरी

वाशी (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी नामे-सुजन बबलु दास, वय ३० वर्षे, रा. बुनिया सितलग्राम ता. लाबपुर जि. बीरभुम राज्य पश्चिम बंगाल हे दि. १८.०६.२०२५ रोजी पारगाव टोलनाका येथुन आयशर गाडीमध्ये हिंदुस्थान युनिलिव्हर लि. कंपनीचे सर्फएक्सल कडल्याचे साबणाचे १४ बॉक्स एकुण १५,४०० किंमतीचे अज्ञात व्यक्तीने गाडीच्या मागील दरवाजाचे लॉक तोडून चोरुन नेले. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-सुजन दास यांनी दि.२२.०६.२०२५ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन वाशी पो ठाणे येथे भा.न्या. सं.कलम ३०३(२) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

### मोटरसायकलला अपघातात

नळदुर्ग (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत मयत नामे-सिराज अब्दुल शेख, वय ४७ वर्षे, रा. रहीमनगर नळदुर्ग ता. तुळजापूर जि. धाराशिव हे दि.०९.०६.२०२५ रोजी मोटरसायकल वरुन नळदुर्ग कडे जात होते. दरम्यान सोलापूर ते नळदुर्ग हायवे ६५ वर ईटकळ शिवारात भैरवनाथ पोल्ट्री फार्म शेजारी मोबाईल टॉवर जवळ रोडवर पिकअप चा चालक आरोपी नामे- सलमान अफरोज शेख, रा. व्यासनगर नळदुर्ग ता. तुळजापूर जि. धाराशिव यांनी त्याचे ताब्यातील पिकअप हे हायगयी व निष्काळजीपणे चालवून सिराज शेख यांचे मोटरसायकलला डाव्या बाजूने धडक दिली. या अपघातात सिराज शेख हे गंभीर जखमी होवून उपचार दरम्यान मयत झाले. नमुद पिकअप चालक हा जखमीस उपचार कामी घेवून न जात वाहनासह पसार झाला. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-हुसेना सिराज शेख, वय ४१ वर्षे, रा. रहीमनगर नळदुर्ग ता.तुळजापूर जि. धाराशिव यांनी दि.२२.०६.२०२५ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन नळदुर्ग पो ठाणे येथे गुन्हा नोंदवला आहे.

**झाडे लावा!**
**झाडे जगवा!!**

## जिल्ह्यात चिकुनगुनियाचे रुग्ण वाढताना,नागरिकांनी अधिक काळजी घ्यावी- जिल्हा हिवताप अधिकारी



धाराशिव,दि.२३ जून (जिमाका) धाराशिव जिल्ह्यात चिकुनगुनियाच्या रुग्णांची संख्या वाढत असून गेल्या पाच महिन्यांत ३०८ जणांचे रक्तनमुने तपासण्यात आले.यापैकी १५ जणांना चिकुनगुनियाची लागण झाल्याचे निष्पन्न झाले आहे.या पार्श्वभूमीवर जिल्हा हिवताप अधिकारी डॉ.मारूती कोरे यांनी नागरिकांना डासांपासून संरक्षण घेण्याचे आणि स्वच्छतेकडे अधिक लक्ष देण्याचे आवाहन केले आहे.

चिकुनगुनिया हा डासांमुळे पसरणारा एक विषाणूजन्य आजार आहे. 'चिकुनगुनिया' हा शब्द आफ्रिकेतील माकोंडे भाषेतील असून त्याचा अर्थ वाकून चालणे असा होतो.या आजारात तीव्र सांधेदुखी होऊन रुग्णाला वाकून चालावे लागते. चिकुनगुनियाचा प्रसार प्रामुख्याने Aedes aegypti आणि Aedes albopictus या डासांद्वारे होतो.हे डास दिवसा चावतात.

संक्रमित डास चावल्यानंतर साधारणतः ३ ते ७ दिवसांत लक्षणे दिसतात.यामध्ये अचानक येणारा ताप (१०२ ते १०४ ), हातापायांतील सांध्यांमध्ये तीव्र वेदना आणि सूज, डोकेदुखी, स्नायू दुखणे, तीव्र थकवा,त्वचेवर पुरळ, मळमळ, उलटी,डोळ्यांची आग आणि प्रकाश सहन न होणे यांचा समावेश होतो. विशेषतः सांधेदुखी दीर्घकाळ टिकणारी असून काही रुग्णांना महिनेभर यातून आराम मिळत नाही.

सध्या चिकुनगुनियावर कोणतीही विशिष्ट लस किंवा औषध उपलब्ध नाही. उपचार लक्षणांनुसार दिले जातात.रुग्णांनी पुरेशी विश्रांती घ्यावी,द्रवपदार्थ भरपूर घ्यावेत आणि डॉक्टरांच्या सल्ल्यानेच वेदनाशामक औषधांचा वापर करावा. पॅरासिटामॉलचा वापर ताप आणि वेदना कमी करण्यासाठी केला जातो, परंतु ॲस्पिरिन व आयबुप्रोफेन टाळावेत. सांध्यांवरील सूज कमी करण्यासाठी थंड पाण्याचा शेक उपयोगी ठरतो.

पौष्टिक आहारामध्ये हिरव्या पालेभाज्या,फळांचे रस,व्हिटॅमिन सी युक्त फळांचा समावेश करावा.काही आयुर्वेदिक उपाय,जसे की पपईच्या पानांचा रस,गुळवेलचा काढा इ.डॉक्टरांच्या मार्गदर्शनाखाली वापरावेत.

चिकुनगुनियापासून संरक्षणासाठी डासांच्या चावण्यापासून बचाव करणे आणि त्यांच्या पैदाशी प्रतिबंध करणे अत्यावश्यक आहे.यासाठी घरात आणि आजूबाजूच्या परिसरात पाणी साचू देऊ नये.टाक्या,कुंड्या,टायर यामधील पाणी नियमितपणे बदलावे. पाण्याच्या भांड्यांना झाकण लावावे. झोपताना मच्छरदाणीचा वापर, खिडक्या-दारांना जाळ्या आणि डास प्रतिबंधक लोशन वापरणे उपयुक्त ठरते.

डॉ.कोरे यांनी सांगितले की, चिकुनगुनिया जरी जीवघेणा आजार नसला तरी त्याची लक्षणे,विशेषतः सांधेदुखी,रुग्णाला फार त्रासदायक ठरू शकते.त्यामुळे लक्षणे दिसताच त्वरित वैद्यकीय सल्ला घ्यावा.

जिल्ह्यातील सर्व आरोग्य केंद्रांना सजगतेच्या सूचना देण्यात आल्या असून जनजागृतीसाठी विविध उपक्रम राबवले जात असल्याची माहिती जिल्हा हिवताप अधिकारी, धाराशिव यांनी दिली.

## धाराशिव येथे जागतिक ऑलिंपिक दिवस उत्साहात साजरा

धाराशिव (जिमाका)- क्रीडा क्षेत्रातील सर्वोच्च व सर्वसमावेशक चळवळ म्हणून ओळखला जाणारा जागतिक ऑलिंपिक दिवस हा २३ जून रोजी दरवर्षी जगात साजरा केला जातो. ऑलिंपिकच्या मूल्यांचा प्रसार आणि क्रीडाविषयी जनजागृती करण्याच्या हेतूने यंदाचा जागतिक ऑलिंपिक डे धाराशिव शहरात महाराष्ट्र ऑलिंपिक असोसिएशन,महाराष्ट्र खो-खो असोसिएशन,जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय,श्रीपतराव भोसले हायस्कूल आणि जिल्हा एकविध क्रीडा संघटनेच्या संयुक्त विद्यमाने साजरा करण्यात आला.

सकाळी ७.३० वाजता श्रीपतराव भोसले हायस्कूल,धाराशिव येथे आयोजित या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून अर्जुन पुरस्कार विजेती सारिका काळे, शिवछत्रपती पुरस्कारार्थी शाहूराज खोगरे, अंकुश पाटील,राजकुमार दहिहंडे,गिरजाप्पा दहिहंडे,डॉ.शुभांगी रोकडे,जागतिक खो-खो विजेती आश्विनी शिंदे,तसेच विविध क्रीडा क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

जिल्हा क्रीडा अधिकारी श्री.हरनाळे यांनी प्रास्ताविक केले.त्यांनी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील खेळाडूंचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला. यावेळी शिवछत्रपती पुरस्कारार्थी शाहूराज खोगरे यांनी ऑलिंपिक स्पर्धेचा इतिहास,स्वरूप आणि महत्त्व यावर मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य नंदकुमार ननवरे यांनी जिल्ह्यातील युवा खेळाडूंना आंतरराष्ट्रीय खेळाडूंचा आदर्श घेऊन प्रगती करण्याचे आवाहन केले.त्यांनी ऑलिंपिक डे साजरा करण्यामागील उद्देश स्पष्ट करत खेळातून मिळणाऱ्या शारीरिक, मानसिक आणि सामाजिक विकासाचे महत्त्व पटवून दिले.

कार्यक्रमात तायक्कांदो खेळाडूंनी दिलेल्या आकर्षक प्रात्यक्षिकांनी उपस्थितांची मने जिंकली.यावेळी तालुका क्रीडा अधिकारी भैरवनाथ नाईकवाडी,अभिजीत पाटील,विक्रम सांडसे,विवेक कापसे,प्रभाकर काळे, तायक्कांदो संघटनेचे राजेश महाजन, क्रीडा अधिकारी अक्षय बिरादार, मार्गदर्शक डिंपल ठाकरे,विश्वास खंदारे यांच्यासह अनेक शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## जात पडताळणीसाठी २६ जुन ते ४ जुलैदरम्यान विशेष मोहीम मागासवर्गीय विद्यार्थ्यांना दिलासा

धाराशिव (जिमाका) - राजर्षी शाहू महाराज जयंती पर्व निमित्ताने जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती,धाराशिवच्या वतीने २६ जून २०२५ ते ४ जुलै २०२५ या कालावधीत विशेष मोहिमेचे आयोजन करण्यात आले आहे.

या मोहिमेचा मुख्य उद्देश मागासवर्गीय विद्यार्थ्यांना जात वैधता प्रमाणपत्र सहज आणि वेळीच उपलब्ध करून देणे हा आहे.

विशेषतः ११ वी, १२ वी विज्ञान शाखेतील तसेच व्यावसायिक अभ्यासक्रमामध्ये सन २०२६-२७ यावर्षासाठी प्रवेश घेणाऱ्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांना या मोहिमेचा लाभ घेता येणार आहे. जात पडताळणी प्रक्रियेसाठी विद्यार्थ्यांच्या तालुका आणि महाविद्यालयनिहाय माहितीचे संकलन करण्यात येणार आहे.ही माहिती समान संधी केंद्राच्या माध्यमातून महाविद्यालय व जिल्हास्तरावर गोळा केली जाईल.

यावेळी समता पंधरवड्यात सीईटी परीक्षा दिलेल्या विद्यार्थ्यांसाठी,तसेच डिप्लोमा अभ्यासक्रमाच्या तृतीय वर्षातील विद्यार्थ्यांचेही अर्ज ऑनलाईन पद्धतीने भरण्यात येणार आहेत.अर्ज भरताना येणाऱ्या अडचणी लक्षात घेता महाविद्यालयीन समान संधी केंद्रामार्फत वेबिनारचे आयोजन करण्यात येईल,जेणेकरून विद्यार्थ्यांना प्रक्रिया समजण्यात मदत होईल.

सर्व मागासवर्गीय विद्यार्थ्यांचे अर्ज समान संधी केंद्राच्या माध्यमातून गोळा करून त्यावर तत्काळ कार्यवाही करण्यात येणार असून, शक्य तितक्या लवकर जात वैधता प्रमाणपत्र वितरीत करण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

जिल्ह्यातील विज्ञान शाखेतील व व्यावसायिक अभ्यासक्रमातील प्रवेशित विद्यार्थ्यांनी तसेच सीईटी परीक्षा दिलेल्यांनी आपले परिपूर्ण अर्ज संबंधित महाविद्यालयामार्फत तयार करून जात पडताळणी समिती कार्यालय, धाराशिव येथे सादर करावेत,असे आवाहन समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

## प्राण्यांना निर्दयपणे वागणुक देवून वाहतुक करणाऱ्यावर गुन्हा दाखल

धाराशिव (प्रतिनिधी)- बेंबळी पोलीस ठाणे अंतर्गत पोलिसाकडून समजलेली माहिती अशी की, बशीर रा. कुरेशी गल्ली नळदुर्ग, महेश विजय सोनटक्के,रा. खंडाळा ता. तुळजापूर जि. धाराशिव यांनी दि.२२.०६.२०२५ रोजी करजखेडा ते तुळजापूर हायवेवर सह्याद्री हॉटेल जवळ रोडवर ताकविकी शिवार येथे पिकअप मध्ये गोवंशीय जातीचे दोन गाय व एक खोंड एकुण ३५,००० किंमतीचे गोवंशीय जनावरे त्यांचे चारा पाण्याची व्यवस्था न करता निर्दयतेने कत्तलीसाठी बेकायदेशीर रित्या वाहतुक करताना बेंबळी पोलीसांना मिळून आले. यावरुन पोलीसांनी सरकारतर्फे नमूद व्यक्तींविरुध्द महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम अन्वये गुन्हा नोंदवला आहे. या प्रकरणी पोलिस अधिक तपास करीत आहेत.

## श्री गजानन महाराज पालखीचे कळंब मध्ये जल्लोषात स्वागत

कळंब (प्रतिनिधी)- हरी नामाचा गजर करत, विठ्ठलाचे अभंग गात पंढरपूर कडे निघालेल्या शेगावच्या गजानन महाराजाच्या पालखीचे गुरुवार दि . २३ जुन रोजी कळंब शहरात आगमन होताच मांजरा नदी तिरावर बीड ,धाराशिव जिल्हा सरहदीवर प्रथम पोलीस प्रशासनाच्या वतीने उपविभागीय पोलीस अधिकारी संजय पवार व कळंब पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक रवि सानप यांनी सायंकाळी ४ वाजता गजानन महाराजांच्या पालखीचे स्वागत करून पूजन करण्यात आले .तसेच महसुल प्रशासनाच्या वतीने उपविभागीय अधिकारी संजय पाटील कळंब चे तहसीलदार हेमंत ढोकले नगर परिषदेचे मुख्य अधिकारी तथा प्रशासक मनीषा गुरमे यांच्या हस्ते श्रींच्या पालखीचे पूजन करण्यात आले या प्रसंगी नगरपरिषदेचे कार्यालयीन अधीक्षक वाघमारे , गोविंद रणदिवे यांच्यासह शहरातील नागरिक व्यापारी कार्यालयातील कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या पालखीच्या आगमनाने शहराला पंढरीचे रूप आले होते.

सोमवार दि. २३ जुन रोजी पालखीचे दर्शन घेण्यासाठी भाविकांनी ठिकठिकाणी गर्दी केली होती. सायंकाळी शहरातून ही मिरवणूक निघाली. दरवर्षी शेगांव येथील गजानन महाराजांची दिंडी पंढरपूर कडे दि . २ जुन ते ३१ जुलै या कालावधीत आपली परिक्रमा पूर्ण केली जाताना कळंब मध्ये मुक्काम आसतो. शहरात प्रवेश करताना भाविकांनी पालखीचे मांजरा नदी येथे पुलावर स्वागत केले. त्यानंतर ही दिंडी परळी रोड, शिवाजी चौक,होळकर चौक ,नगर परिषद शाळा क्र.१ च्या मैदानात ही मिरवणूक विसर्जित करण्यात आली.श्रीची आरती होऊन बापूराव करंजकर परिवाराच्या वातिने वारकऱ्याना रात्रीच्या भोजना ची व्यवस्था करण्यात आली होती .संत श्रेष्ठ गजानन महाराज संस्थान पालखी सोहळा कळंब शहरात दाखल होतोय च गण गण गणात बोते नाम संकीर्तन घेऊन जीवन पावन करून घ्यावेत तस पाहता कळंब शहरातील भाविक गजानन महाराज पालखीचे वाजत गाजत दरवर्षी स्वागत करतात. कारण शेगावीचे राजा संत श्रेष्ठ गजानन महाराज विठ्ठल भेटी साठी पायी चालत आहे पण सोबत हरिनाम स्मरण करत करत सकल संताना आलिंगन देऊन या संताकरवी सत्कार करून घेत निघालेत तुकोबाराय म्हणतात.

उजळले भाग्य आता !
अवघी चिंता वारली!
संत दर्शनी हा लाभ!
पद्मलाभ जोडीला!!

## रामकृष्ण परमहंस महाविद्यालयात जागतिक योग दिन उत्साहात साजरा



धाराशिव (प्रतिनिधी)- येथील रामकृष्ण परमहंस महाविद्यालयात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉक्टर जयसिंगराव देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली जागतिकी योग दिन उत्साहात पार पडला.

जागतिक योग दिनाचे औचित्य साधून महाविद्यालयात योग प्रशिक्षकाद्वारे योगासन प्राणायाम ध्यानधारणा इत्यादीचा अभ्यास व प्रात्यक्षिक करण्यात आले. योगाचे महत्त्व यावेळी सांगण्यात आले.

यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉक्टर जयसिंगराव देशमुख म्हणाले की, व्यायामाबरोबरच योग आणि ध्यानधारणा त्याचबरोबर प्राणायाम हे अत्यंत महत्त्वाचे आहे त्यामुळे मन आणि शरीर संतुलित ठेवण्यास मदत होते.

यावेळी राष्ट्रीय छात्र सेना राष्ट्रीय सेवा योजना आणि शारीरिक शिक्षण विभाग या विभागांमार्फत या योग प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉक्टर जयसिंगराव देशमुखअंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक डॉक्टर संदीप देशमुख कॅप्टन केशव क्षीरसागर,शारीरिक शिक्षणसंचालक प्राध्यापक राजा जगताप राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे कार्यक्रमाधिकारी प्राध्यापक दत्तात्रय साखरे यांचे या कार्यक्रमासाठी योगदान लाभले.

राष्ट्रीय छात्र सेनेच्या वतीने सर्व कॅडेट साठी या प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले.यावेळी धाराशिव परिसरातील सर्व राष्ट्रीय क्षेत्र सेनेतील कॅडेट्स उपस्थित होते.

सदर कार्यक्रम महाविद्यालयाचे प्राचार्य डॉक्टर जयसिंगराव देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न झाला.

## डॉ. मुरहरी केळे यांना मराठी विषयात पीएच.डी. पदवी प्रदान



धाराशिव(प्रतिनिधी) -मराठी साहित्य क्षेत्रात महत्वाची कामगिरी बजावणारे संत साहित्याचे अभ्यासक, त्रिपुरा राज्य विद्युत मंडळाचे माजी अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, तसेच महाराष्ट्र आणि मध्यप्रदेश येथे वीज क्षेत्रात संचालक म्हणून काम केलेले डॉ. मुरहरी केळे यांना नुकतीच डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर तर्फे मराठी विषयात पीएच.डी. ही सर्वोच्च पदवी बहाल करण्यात आली आहे. त्यांनी 'निवडक मराठी साहित्यातील विजेचे चित्रण : एक अभ्यास' या आगळ्या-वेगळ्या विषयावरील शोधप्रबंध त्यांनी विद्यापीठाला सादर केला होता.

डॉ. केळे यांनी आपल्या संशोधनात गेल्या एक हजार वर्षातील निवडक काव्यात्म, कथनात्म, नाट्यात्म साहित्याचा अभ्यास करून एका वेगळ्या विषयाकडे मराठी अभ्यासकांचे लक्ष वेधले आहे. विजविषयक साहित्याचा सामाजिक, सांस्कृतिक, अध्यात्मिक, भावनिक, वैज्ञानिक आशयांचा सखोल मागोवा घेतांना ङ्गवीजफ या संकल्पनेचा वैदिक साहित्यापासून संत-पंत-तंत साहित्याचा वेगवेगळ्या अंगाने मागोवा घेत प्राचीन, अर्वाचीन, आधुनिक आणि अत्याधुनिक साहित्याचा आढावा घेवून त्यांनी अभ्यासपूर्ण असे निष्कर्ष काढले आहेत. त्यांच्या अतिशय त्यांच्या हटके संशोधन कार्याचे मराठी साहित्य विश्वात कौतुक करण्यात येत आहे.

डॉ. मुरहरी केळे यांना शिक्षणाची प्रचंड आवड असून त्यांनी वेगवेगळ्या विद्यापीठांतून अभियांत्रिकी, व्यवस्थापन, कायदा, माहिती आणि तंत्रज्ञान, पत्रकारिता, उर्जा अंकेक्षण या वेगवेगळ्या व्यावसायिक विषयात दहा पदव्या घेतल्यानंतरही स्वस्थ न बसता नागपूर विद्यापीठातून पॉवर डीस्ट्रीब्युशन फ्रान्चायसी या विषयावर पहिली पीएच.डी. घेतली असतांना देखील मराठी विषयाची आवड असल्यामुळे त्यांनी मराठी भाषेत एम.ए. करून दुसरी पीएच.डी. मिळवली. या दुहेरी यशाबद्दल त्यांचे तेलंगणाचे राज्यपाल आणि त्रिपुरा राज्याचे माजी उपमुख्यमंत्री जिष्णू देव वर्मा, विद्यापीठाचे कुलगुरू, उपकुलगुरू यांचेसह विविध साहित्यिक, प्राध्यापक, अभ्यासक, समाजबांधव आणि वीज क्षेत्रातील सहकार्यांकडून अभिनंदन होत असून, मराठी साहित्यातील त्यांच्या अमूल्य योगदानाची दखल घेतली जात आहे.

ओ३म् भूर्भुवः स्वः ।
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो नः प्रचोदयात् ।।

# लातूर समाचार

## अमेरिकेचे धोरण विध्वंसक?

इस्त्राईल व इराणच्या वादात अमेरिकेने रविवारी प्रत्यक्षात सहभाग घेतल्याने जगात चिंता निर्माण होणे स्वाभाविक आहे. २० व्या शतकाच्या उत्तरार्धापासून अमेरिका आणि इराण यांच्यातील संबंध कायमच तणावपूर्ण राहिले आहेत. हे तणाव कधी थेट युद्धाच्या उंबरठ्यावर पोहोचले, तर कधी राजनैतिक वाटाघाटीच्या पातळीवर कमी झाले. २००० नंतर हे संबंध आणखीन गुंतागुंतीचे झाले. १९५३ मध्ये इराणचे पंतप्रधान मोहम्मद मोस्सदक यांचे सरकार सीआयए व ब्रिटिश गुप्तचर संस्थेच्या मदतीने उलथवण्यात आले. इराणच्या तेल उद्योगाचे राष्ट्रीयीकरण अमेरिकेला आणि ब्रिटनला खटकले होते. यानंतर शाह रजा पहलवी यांना सत्तेवर आणले गेले आणि अमेरिका-इराण संबंध सुदृढ झाले. परंतु १९७९ मध्ये इस्लामी क्रांती झाली आणि आयातोल्ला खोमेनीच्या नेतृत्त्वाखाली इस्लामी प्रजासत्ताक स्थापन झाले. त्याच वर्षी तेहरानमधील अमेरिकी दूतावासावर विद्यार्थी आंदोलनकर्त्यांनी ताबा घेतला आणि ५२ अमेरिकी नागरिकांना ४४४ दिवस बंदी ठेवण्यात आले. हाच प्रसंग अमेरिका-इराण संबंध बिघडण्याचा टर्निंग पॉइंट ठरला. २००२ मध्ये इराणच्या नतांझ आणि फोर्डो येथे गुप्त अणुऊर्जा प्रकल्प उघडकीस आले. अमेरिका आणि पश्चिमी देशांनी इराणवर आरोप केले की ते अण्वस्त्र कार्यक्रम राबवत आहेत. या पार्श्वभूमीवर संयुक्त राष्ट्रांनी आणि अमेरिका-युरोपियन युतीने इराणवर आर्थिक निर्बंध लादले. इराणने सुरुवातीला हे आरोप फेटाळले, पण आंतरराष्ट्रीय आयएईएनेही संशय व्यक्त केला. २०10 नंतर इराणच्या अर्थव्यवस्थेवर विपरित परिणाम होऊ लागला. २०१५ मध्ये ओबामा प्रशासन आणि (अमेरिका, रशिया, चीन, फ्रान्स, ब्रिटन आणि जर्मनी) यांनी इराणसोबत करार केला. यात इराणने यूरेनियम समृद्धी ३.६७% वर मर्यादित ठेवण्याचे मान्य केले. अणुऊर्जा साठा ३०० किलोपर्यंत मर्यादित ठेवण्यात आला. याच्या मोबदल्यात अमेरिका व युरोपीय राष्ट्रांनी इराणवरील काही निर्बंध उठवले. हा करार मध्यपूर्वेतील शांततेसाठी मोठे पाऊल मानले गेले. २०1८ मध्ये राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी जेसीपीआ करार 'अयशस्वी' असल्याचे सांगत त्यातून एकतर्फी माघार घेतली. त्यानंतर इराणवर कडक आर्थिक निर्बंध पुन्हा लागू करण्यात आले. यामुळे इराणची तेलनिर्यात ८०% नी घटली. चलन घसरण आणि महागाईत मोठी वाढ झाली. देशांतर्गत असंतोष वाढू लागला. इराणनेही आपल्या अणुकार्यक्रमाची काही बंधने मागे घेतली आणि युरेनियम समृद्धी पुन्हा सुरू केली. सोलैमानी हत्या आणि युद्धजन्य परिस्थिती निर्माण झाली. जनरल कासेम सोलैमानी, इराणच्या क्यूडास क्युरेशी प्रमुख आणि सरकारचा महत्वाचा नेता, यांना ३ जानेवारी २०२० रोजी बगदादमध्ये अमेरिकी ड्रोन हल्ल्यात ठार करण्यात आले. या घटनेनंतर इराणने इराकमधील अमेरिकी सैन्य तळांवर मिसाइल हल्ले केले. जागतिक बाजारात तेलाच्या किंमतीत मोठी उसळी आली. बायडन प्रशासन आणि पुन्हा वाटाघाटीचा प्रयत्न राष्ट्राध्यक्ष जो बायडन यांनी २०२१ नंतर पुन्हा जेसीपीओए मध्ये सहभागी होण्याची इच्छा दर्शवली. अनेक फेऱ्यांच्या वाटाघाटी झाल्या. २२ जून २०२५ -मध्ये अमेरिका व इस्रायलने एकत्रित कारवाईत अणु-संस्थांवर हवाई हल्ले केले.याचा आता आर्थिक परिणाम: जगभरात कच्च्या तेलाच्या किंमती वाढल्या जाणार आहेत. अमेरिका आणि युरोपमध्ये इंधन दरांवर ताण पडणार आहे. इराणमध्ये स्थानिक अस्थिरता आणि वाढता संताप व्यक्त केला जात आहे. या बाबत संयुक्त राष्ट्र संघाने शांतीसाठी त्वरित हस्तक्षेप सुरू केला आहे. जर इराणने बंद हारम्यूझ बंद केला तर थेट युद्ध अपरिहार्य. अमेरिका-इराण संबंध हा शक्ती आणि राजनैतिक धोरणाचा संघर्ष आहे. २००० नंतर या संबंधात अणुऊर्जा, आतंकवादविरोध, प्रॉक्सी युद्ध, आणि तेल या चार मुद्द्यांचा प्रमुख प्रभाव आहे. २०२५ मध्ये परिस्थिती इतकी तीव्र आहे की जागतिक शांतता धोक्यात आहे. अमेरिकेने आता प्रत्यक्षात हस्तक्षेप केल्याने विपरीत घडणार आहे. कच्चे इंधन व गॅसच्या किंमती वाढण्याची शक्यता आहे. या दोघांच्या युद्धाचा परिणाम जगभर दिसून येणार आहे. त्याच प्रमाणे तसे पाहिले तर दोघे देश इराण आणि ईस्त्राईल हे भारताचे मित्र देश समजले जातात. त्यामुळे अमेरिकेने सामंज्याची भुमिका घेणे सर्वांचे हीताचे ठरणारे आहे. भारताने सावध पवित्रा घेतला आहे. युद्धाचे परिणामाची आठवण दिली असली तरी ईस्त्राईल हा देश लहान असला तरी तो जिद्दीने लढत आहे. ईराणचे मोठे नुकसान होणार आहे यात शंका नसली तरी आज जी बॉम्ब टाकले जात आहे. विध्वंसक प्रकार दिसून येत आहे. यामुळे मोठी हानी होत आहे. काही झाले तरी युद्ध थांबले पाहिजे असे जगातील लहान देशांना वाटत आहे. तेल साठाच्या व आर्थिकदृष्ट्या सक्षम असणाऱ्या ईराणाला ईस्त्राईल तोडीसतोड लढत आहे. त्याची जिद्द पाहून तरी मागे सरकरणे हीताचे आहे. या युद्धाचा परिणाम काही दिवसात जगभरात दिसून येणार आहे. महागाईत वाढ होणार आहे. चीन सारखे देश या संधीचा फायदा घेण्याची शक्यता आहे. त्यामुळे विशेष करून भारताला सावध पावले टाकावी लागणार आहेत. चीन, पाकिस्तान, बांगलादेशाकडून भारताला या काळात दगाफटका बसू शकतो. त्यामुळे कोणत्याही परिस्थितीत युद्ध थांबणे आवश्यक आहे. अमेरिकेने शांततेचे आवाहन करून युद्धविरामाकडे वाटचाल असली पाहिजे. नसता जागतिक महायुद्धाची चाहूल म्हटले तरी चुकीचे ठरणारे नाही.

# डेंग्यू प्रतिबंधाकरिता लातूर महानगरपालिका ॲक्शन मोडवर

**लातूर/प्रतिनिधी** : डेंग्यू प्रतिबंधात्मक उपाययोजनांचा महत्त्वाचा भाग म्हणून आयुक्त श्रीमती मानसी, लातूर शहर महानगरपालिका यांच्या आदेशानुसार आणि उपायुक्त डॉक्टर पंजाबराव खानसोळे यांच्या मार्गदर्शनानुसार लातूर शहरामध्ये अबेटिंग मोहीम राबवण्यात येत आहे. या मोहिमेमध्ये महानगरपालिकेच्या आरोग्य विभागातील २०३ आशा स्वयंसेविका ४६ आरोग्य सेविका आणि १६ आरोग्य कर्मचारी पुरुष यांचा सहभाग असणार आहे या मोहिमेमध्ये घरोघरी जाऊन डास उत्पत्तीच्या ठिकाणांचे सर्वेक्षण करण्यात येणार असून आढळलेली डास उत्पत्तीचे ठिकाणी शक्यतो नष्ट करणे किंवा तसे शक्य नसल्यास त्या पाण्यामध्ये औषध टाकने, प्रसंगी वारंवार डास उत्पत्तीचे ठिकाणे आढळून येणाऱ्या ठिकाणी संबंधितांना सूचना पत्र देणे ही कामे केली जाणार आहेत. यासोबतच शहरामध्ये डासांवर नियंत्रण आणण्यासाठी प्रसंगी धूरफवारणी देखील केली जाणार आहे.

सन २०२४ या वर्षात आरोग्य विभाग लातूर मनपा मार्फत संशयित डेंग्यू रुग्ण यांचे एकूण १६९३ रक्तजल नमुने संकलित करून त्यांची सेन्टेनल लॅब येथे डेंग्यू तपासणी करण्यात आली होती, त्यापैकी लातूर शहरातील ९३५ रुग्णांपैकी ३१९ रुग्णांचे रक्तजल नमुने डेंग्यू करिता पॉझिटिव्ह आले होते. परंतु यावर्षी डेंग्यू रोगाचा प्रादुर्भाव शहरामध्ये आणखी कमी करण्याच्या दृष्टीने विविध उपाययोजना राबवण्यात येणार आहेत. सर्वात महत्त्वाचे नागरिकांनी देखील जागरूक राहून आपल्या स्तरावरील प्रतिबंधात्मक उपाययोजनांचा सुयोग्य वापर केला पाहिजे, असे मत लातूर महानगरपालिकेचे वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. शंकर भारती यांनी व्यक्त केले.





**डेंग्यू विषयी महत्त्वाचे**

डेंग्यू झालेल्या बहुतेक लोकांना सर्वात सामान्य लक्षणे म्हणजे उच्च ताप, डोकेदुखी, अंगदुखी, मळमळ आणि पुरळ . बहुतेक लोक १-२ आठवड्यात बरे होतात. काही लोकांना गंभीर आजार होतो आणि त्यांना रुग्णालयात उपचारांची आवश्यकता असते. गंभीर प्रकरणांमध्ये, डेंग्यू प्राणघातक ठरू शकतो.

विशेषतः दिवसा डास चावणे टाळून तुम्ही डेंग्यूचा धोका कमी करू शकता. डेंग्यूवर सध्या कोणताही विशिष्ट उपचार नसल्याने लक्ष्मणानुसार उपचार केले जातात.

**लक्षणे –**

डेंग्यू झालेल्या बहुतेक लोकांना सौम्य किंवा कोणतीही लक्षणे नसतात आणि ते १-२ आठवड्यांत बरे होतात.

प्रामुख्याने ताप, डोकेदुखी, डोळ्याच्या मागील बाजूस तीव्र वेदना, थकवा, अंगदुखी, लालसर रंगाची लघवी होणे, इत्यादी लक्षणे असू शकतात.

दुसऱ्यांदा संसर्ग झालेल्या व्यक्तींना गंभीर डेंग्यूचा धोका जास्त असतो.

**ताप कमी झाल्यानंतर डेंग्यूची गंभीर लक्षणे अनेकदा दिसून येतात:**

तीव्र पोटदुखी
सतत उलट्या होणे
जलद श्वास घेणे
हिरड्या किंवा नाकातून रक्त येणे
थकवा
अस्वस्थता
उलट्या किंवा मल मध्ये रक्त येणे खूप तहान लागणे
फिकट आणि थंड त्वचा
अशक्तपणा जाणवणे.

ही गंभीर लक्षणे असलेल्या लोकांनी ताबडतोब काळजी घ्यावी.

बरे झाल्यानंतर, डेंग्यू झालेल्या लोकांना अनेक आठवडे थकवा जाणवू शकतो.

**निदान आणि उपचार –**

डेंग्यूवर कोणताही विशिष्ट उपचार नाही. लक्षणानुसार उपचार करण्यावर लक्ष केंद्रित केले जाते. डेंग्यू तापाच्या बहुतेक प्रकरणांमध्ये घरी उपचार करता येतात.

वेदना नियंत्रित करण्यासाठी ॲसिटामिनोफेन (पॅरासिटामॉल) चा वापर केला जातो. इबुप्रोफेन आणि ॲस्पिरिन सारखी नॉन-स्टेरॉइडल अँटी-इंफ्लेमेटरी औषधे टाळली जातात कारण ती रक्तस्त्राव होण्याचा धोका वाढवू शकतात.

गंभीर डेंग्यू असलेल्या लोकांना अनेकदा रुग्णालयात दाखल करावे लागते.

**संसर्ग –**

डासांच्या चाव्याव्दारे संक्रमण

डेंग्यू विषाणू संक्रमित मादी डासांच्या चाव्याव्दारे मानवांमध्ये पसरतो, प्रामुख्याने एडीस एजिप्ती डास. एडीस वंशातील इतर प्रजाती देखील वाहक म्हणून काम करू शकतात, परंतु त्यांचे योगदान सामान्यतः एडीस एजिप्तीपेक्षा दुय्यम असते.

**प्रतिबंध आणि नियंत्रण –**

डेंग्यू पसरवणारे डास दिवसा सक्रिय असतात.

खालील गोष्टी वापरून डासांच्या चावण्यापासून स्वतःचे संरक्षण करून डेंग्यू होण्याचा धोका कमी करा: –

**शक्य तितके शरीर झाकणारे कपडे;**

दिवसा झोपण्यासाठी मच्छरदाण्या वापराव्यात, तर कीटकनाशक फवारलेल्या जाळ्या वापराव्यात;

**खिडकीचे पडदे;**

डास प्रतिबंधक (DEET, Picaridin किंवा IR३५३५ असलेले); आणि कॉइल आणि व्हेपोरायझर.

**डासांची पैदास रोखता येते:**

पर्यावरणीय व्यवस्थापन आणि सुधारणांद्वारे डासांना अंडी घालणाऱ्या अधिवासात प्रवेश करण्यापासून रोखणे;

घनकचऱ्याची योग्य प्रकारे विल्हेवाट लावणे आणि पाणी साठवू शकणारे कृत्रिम मानवनिर्मित अधिवास काढून टाकणे;

आठवड्यातून एकदा घरगुती पाणी साठवणूक भांडी झाकणे, रिकामे करणे आणि स्वच्छ करणे;

बाहेरील पाणी साठवण्याच्या भांड्यांमध्ये योग्य कीटकनाशके वापरणे.

जर तुम्हाला डेंग्यू झाला तर हे महत्वाचे आहे: –

विश्रांती;

**भरपूर द्रवपदार्थ प्या;**

वेदनांसाठी ॲसिटामिनोफेन (पॅरासिटामॉल) वापरा;

इबुप्रोफेन आणि ॲमस्पिरिन सारख्या नॉन-स्टेरॉईडल अँटी-इंफ्लेमेटरी औषधे टाळा; आणि

गंभीर लक्षणे दिसल्यास लवकरात लवकर डॉक्टरांचा सल्ला घ्यावा.

तरी नागरिकांनी देखील डेंगी आजाराच्या प्रतिबंधाकरिता वैयक्तिक पातळीवरून सक्रिय सहभाग नोंदवून आपला खारीचा वाटा उचलावा आणि

या राबवण्यात येणाऱ्या अबेटिंग मोहिमे करिता आपल्या घरी किंवा परिसरात येणाऱ्या आरोग्य कर्मचाऱ्यांना सहकार्य करण्याचे आवाहन लातूर महानगरपालिकेमार्फत करण्यात आले आहे.

# 'उजेडाच्या वाटेने' गौरवांक प्रकाशन समारंभ..

**लातूर/प्रतिनिधी** : समाज आणि संघटनेने दिलेल्या विशेष संधीची, प्राचार्य श्री बालाजी कांबळे यांनी जाणिवपूर्वक विकेंद्रीकरण करून, आपल्या संबंध आयुष्यामध्ये अगदी सर्वत्र मुक्त हस्ते उधळण केली, असे गौरोद्गार शिक्षक आमदार श्री विक्रम काळे यांनी काढले. २२ जून रोजी लातूर येथे ते प्राचार्य बालाजी सांळुके यांच्या सेवापूर्ती गौरव समारंभामध्ये, प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी ज्येष्ठ विचारवंत प्राचार्य डॉ. माधवराव गादेकर हे होते. विचारपीठावर प्रा. ओमप्रकाश साकोळकर, ॲड. बाबासाहेब कोरे, सौ. उज्वलाताई साळुंके, प्रा. डॉ. भगवान वाघमारे, प्रा. डॉ. शिवाजीराव जवळगेकर, प्राचार्य डॉ. राजकुमार मस्के, प्रा. रामकिशन सोनकांबळे, राजाराम मुळे आदी मान्यवरांची विशेष उपस्थिती होती. प्रारंभी उपस्थित पाहुण्यांच्या हस्ते महापुरुषांच्या एकत्रित प्रतिमांना पुष्प अर्पण व दिप प्रज्वलन करून, सामूहिक अभिवादन करण्यात आले. यावेळी बोलताना आ. विक्रम काळे पुढे म्हणाले की, कोणतेही संघटन हे केवळ दाखविण्याची वा मिरवण्याची वस्तु नसते. तर ती व्यक्ती आणि समाजाचे प्रश्न सोडविण्याचे एक साधन असते. शिवाय ते समाज जागृतीचे प्रभावी माध्यम पण असते. शासनाने आपल्या अभ्यास समितीच्या एकूण ८६ शिफारसी पैकी, ६७ शिफारसी स्वीकारल्या आहेत. तसेच अबकड वर्गीकरणासाठी हा आमदार काळे आपल्या सोबत आहे, असा त्यांनी जाहीर दिलासाही दिला. त्यानंतर सर्व मान्यवरांच्या हस्ते, ' उजेडाच्या वाटेने..' या गौरवांकाचे प्रकाशन करण्यात आले. तर या ग्रंथाचे संपादक प्रा. रामकिशन समुखराव यांनी, सदर गौरवांकाचे अंतरंग मार्मिक पणे उलगडून, हे संपादन भावी पिढ्याना पदर्शक ठरेल, असा विश्वासही व्यक्त केला. तसेच सेवापूर्ती गौरव समितीच्यावतीने, आमदार श्री विक्रम काळे यांच्या हस्ते प्राचार्य बालाजी साळुंके व सौ. उज्वलाताई साळुंके यांचा हृद्य सत्कार करण्यात आला. तर मान पत्राचे वाचन प्रा. डॉ. सुशीलप्रकाश चिमोरे यांनी केले.

यावेळी बोलतांना प्राचार्य डॉ. राजकुमार मस्के हे म्हणाले की, प्राचार्य बालाजी साळुंके यांनी आपल्या जीवनामध्ये नैराश्य व अती उत्साहाला कटाक्षाने दूर ठेऊन, त्यांनी सकारात्मकत्तेचा सम्यक समतोल साधला. अहंकारांची खुरपणी करून, त्यांनी त्या उपद्रवी तणाचा अगदी समूळ नाश केला. आणि ते संस्काराचे एक विद्यापीठ ठरले. मैत्रीनाशाला सुद्धा त्यांनी हद्दपार केले. आपले हात हे नवनिर्मितीसाठी व दुःखातांचे अश्रू पुसण्यासाठीच असतात हे सिध्द करून, प्राचार्य साळुंके यांच्या दृष्टीवंत नेत्रांनी येथे सुंदर मानवी सृष्टी निर्माण केली, असे प्राचार्य मस्के म्हणाले. तर वेळी मनोगत व्यक्त करताना प्राचार्य बालाजी साळुंके म्हणाले की, माझा स्वभाव सत्यनिस्ट आणि अगदी स्पष्ट आहे. त्यामुळे मला असंख्य मित्र लाभले. असत्य वा मत्सराने माझ्या जीवनाला केव्हाही स्पर्श केला नाही. गरिबीतील माझे कुटुंब कायम एकत्रित राहिले. आणि तोच एक संस्कार म्हणून विद्यार्थी जीवनातही एक पुस्तक, एक भाकर व एक ड्रेस वाटून- वाटून, आम्ही मित्रांनी शिक्षणाची कास धरली. तर यावेळी प्रा. सुधीर अनवले, नरसिंग घोडके, प्रा. डॉ. जवळगेकर, प्रा. डॉ. वाघमारे, सेवानिवृत्त तहसिलदार सुखदेव दांडगे, प्रा. ओमप्रकाश साकोळकर यांची भाषणं झाली. तसेच यावेळी आ. काळे यांच्या हस्ते समाज भूषण के. डी. उफाडे, संपादक प्रा. रामकिशन समुखराव व गुरुकृपा ग्राफिक्सचे बापू सांडूर यांचा सत्कार करण्यात आला.



यावेळी अध्यक्षीय समारोप करताना ज्येष्ठ विचारवंत प्राचार्य डॉ. माधवराव गादेकर म्हणाले की, भाकरीच्या भूकेपेक्षा ज्ञानाची भूक अधिक महत्वाची आहे. व्यक्तीला सतत विचारांची भूक लागली पाहिजे. डॉ. आंबेडकरांच्या तत्वज्ञानाने आम्हास स्वाभीमान मिळाला. अंधःकारमय झालेले आपले जगणे हे, या महापुरुषांच्या विचाराने प्रकाशमान झाले. शिक्षण हे आपल्या परिवर्तनाचे माध्यम आहे. म्हणून ज्ञानाची भूक आपण सतत अतृप्त ठेवावी. प्राचार्य साळुंके ही लसाकमची एक ओळख आहे. मूळ पायातील समर्पणाच्या त्या दगडावरच, लसाकमची आज इमारत उभी आहे. याची पायवाट पुढे घर-झोपडीपर्यंत पोहचली असल्याचेही प्राचार्य गादेकर म्हणाले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. उत्तम दोरवे यांनी केले. सूत्रसंचालन दयानंद कांबळे यांनी केले. आभार प्रदर्शन बाळकृष्ण साळुंके यांनी केले. या प्रसंगी छगन गायकवाड, शिवाजीराव गायकवाड चिखलीकर, संतोष गादेकर, पांडुरंग मोरे, प्रा. राम कांबळे, प्रा. अकुंश नाडे, बी. बी. गायकवाड, पांडूरंग देडे, संभाजी दोरवे, संतराम मोटेराव, अशोक तोगरे, मारोती सुर्यवंशी, पांडुरंग गोरे, राहुल साळुंके, वी. पी. सुर्यवंशी, सारंग साळुंके, ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते तथा एनसीआयबीचे जिल्हा संचालक शिरीषकुमार शेरखाने, प्रा. रामकिशन समुखराव, के. के. कांबळे, सुशील साळुंके, दत्तात्रय मुंडे, अकुंश देवकते, संजय व्यवहारे, व्यंकटराव सरवदे, शिवाजीराव तरुडे, दिगंबर बारसकर, रमेश कलवले, व्यंकटेश काकनाटे, अप्पाराव शिंदे, संभाजीराव मस्के, सुरेश चव्हाण, व्यंकटराव सरवदे आदी स्त्री - पुरुष मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागात उत्साह आणि सामूहिक सहभागाने आंतरराष्ट्रीय योग दिन २०२५ साजरा

**सोलापूर/प्रतिनिधी** : मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागाने त्यांच्या कार्यालये, स्थानके आणि डेपोंमध्ये ११ वा आंतरराष्ट्रीय योग दिन (आयडीवाय) २०२५ मोठ्या उत्साहाने आणि सामूहिक सहभागाने साजरा केला. या वर्षीची जागतिक थीम - एक पृथ्वी, एक आरोग्यासाठी योग - मानवी कल्याण आणि आपल्या ग्रहाच्या आरोग्यामधील खोल परस्परसंबंधावर प्रकाश टाकते, जी सर्वे संतू निरामय (सर्व रोगमुक्त होऊ दे) या भारतीय नीतिमत्तेचे प्रतिबिंब आहे.

या उत्सवाचा एक भाग म्हणून,



सोलापूर येथील बाल विकास शाळेत रेल्वे अधिकारी आणि कर्मचाऱ्यांसाठी एक विशेष योग सत्र आयोजित करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे उद्घाटन अतिरिक्त विभागीय रेल्वे व्यवस्थापक (एडीआरएम) श्री अंशुमाली कुमार यांनी केले, ज्यांनी उपस्थितांना संबोधित केले आणि शारीरिक आरोग्य, मानसिक शांती आणि भावनिक संतुलन वाढवण्यासाठी योगाचे समग्र फायदे यावर भर दिला.

योग प्रशिक्षक श्रीमती पूर्णिमा टंकसाळी यांनी आयुष मंत्रालयाने निर्धारित केलेल्या सामान्य योग प्रोटोकॉलवर आधारित मार्गदर्शनित योग सत्रात सहभागींचे नेतृत्व केले. योगाचा समावेश दैनंदिन दिनचर्येत कसा केला जातो, यामुळे ताण कमी होण्यास आणि जीवनातील निरोगी संतुलन राखण्यास कशी मदत होते याबद्दल त्यांनी मौल्यवान अंतर्दृष्टी देखील दिली.

भारतीय रेल्वेच्या कर्मचारी कल्याण आणि जनसंपर्कासाठीच्या वचनबद्धतेनुसार, सोलापूर विभागातील सर्व प्रमुख स्थानके आणि डेपोंवर योग दिनाचे उपक्रम देखील आयोजित करण्यात आले. सोशल मीडियावरील जागरूकता मोहिमेसोबत, योगाच्या आरोग्य फायद्यांचा प्रचार करणारे माहितीपर प्रदर्शन डिस्प्ले स्क्रीनवर लावण्यात आले आणि जागरूकता निर्माण करण्यासाठी स्थानकांवर मधुर योगगीत वाजवण्यात आले.

अशा उत्सवांद्वारे सोलापूर विभाग आपल्या कर्मचाऱ्यांच्या आणि व्यापक समुदायाच्या समग्र कल्याणासाठी असलेल्या समर्पणाला बळकटी देतो.

## अंथरूणात पडताक्षणी एका मिनिटांत लागेल शांत व डाराडूर झोप, करा अध्यात्मिक गुरू श्री श्री रविशंकरची ही भन्नाट ट्रिक

दिवसभराच्या धावपळीमुळे, तणावाने भरलेल्या जीवनशैलीमुळे आणि सतत डोळ्यांसमोर मोबाईल-स्क्रीन असण्यामुळे आज झोपेचा प्रश्न गंभीर बनला आहे. खूप जण रात्री उशिरापर्यंत जागतात, डोळे मिटूनही विचार थांबत नाहीत आणि झोप लागलीच तरी मध्येच जाग येते. झोप न लागणे ही केवळ थकवा देणारी गोष्ट नाही, तर ती मानसिक आणि शारीरिक आरोग्य दोन्हीवर खोल परिणाम करणारी समस्या आहे. पण या समस्येवरही उपाय आहे तोही अगदी सहज आणि नैसर्गिक! अलीकडेच आध्यात्मिक गुरु श्री श्री रविशंकर यांनी त्यांच्या सोशल मीडियावर झोपेच्या त्रासांबद्दल सविस्तर सांगत काही सोपे आणि परिणामकारक उपाय सुचवले. त्यांच्या मते, जर आपण हे उपाय नियमितपणे आचरणात आणले, तर नैसर्गिक आणि शांत झोप परत येऊ शकते.

**प्राणायाम**–श्वासोच्छ्वासाचे नियमन म्हणजेच प्राणायाम मन आणि शरीराला एकत्र शांत करतं. गुरुदेव म्हणतात की खोल श्वास घेणं आणि हळूहळू सोडणं हे तणावग्रस्त नर्व्हस सिस्टिमला रिलॅक्स करतं आणि त्यामुळे झोप येण्याची प्रक्रिया अधिक सहज होते. विशेषतः रात्री झोपण्याआधी काही मिनिटे अनुलोम-विलोम किंवा दीर्घ श्वसन केले तर मनातले विचार थांबतात आणि शरीर एक प्रकारे झोपेसाठी तयार होतं.

## केसांच्या आरोग्या करिता करा लसूणाचा वापर


एखादा आजार, प्रदूषण, मानसिक किंवा शारीरिक तणाव, अपुरे पोषण – कारणे कोणतीही असोत, केसगळती जर जास्त प्रमाणांत होऊ लागली तर तो चिंतेचा विषय ठरू लागतो. प्रमाणाबाहेर गळणाऱ्या केसांसाठी अनेक घरगुती, प्रभावी उपाय आहेत, त्यांपैकी एक आहे केसांसाठी लसुणाचा वापर करणे. लसूण केसांच्या आरोग्याकरिता निरनिराळ्या पद्धतीने वापरता येतोच, त्याशिवाय लसूण हा प्रत्येक स्वयंपाकघरामध्ये हटकून सापडणारा असल्यामुळे याचा वापर करणे अवघडही नाही. केवळ भोजनाचा स्वाद वाढविण्याच्या शिवाय लसूण एकंदर शारीरिक आरोग्याच्या दृष्टीनेही अतिशय उपयुक्त आहे. यातील तत्वांमुळे केसगळतीची समस्या देखील पुष्कळ अंशी कमी होते. अनेकांना केसांवर लसूण लावल्याने डोक्याला खाज सुटू शकते. काहीच मिनिटांमध्ये ही खाज नाहीशी होते, पण तसे न झाल्यास केसांसाठी लसूणाचा वापर टाळावा. लसुणात असलेली झिंक, सल्फर, आणि कॅल्शियम ही तत्वे केसांच्या आरोग्याच्या दृष्टिने चांगली असून, लसुणातील सेलेनियम हे तत्व केसांच्या मुळांशी रक्ताभिसरण वाढविणारे आहे. रक्ताभिसरण वाढल्याने केसांची मुळे मजबूत बनून केसगळती कमी होण्यास मदत होते. त्याशिवाय हे तत्व डोक्यातील कोंडा कमी करून केसांच्या मुळांशी असलेली रंध्रे खुली होण्यासही सहायक असते. केसांच्या आरोग्यासाठी लसुणाचा उपयोग निरनिराळ्या प्रकारे करता येतो. लसूण आणि खोबरेल तेल यांचे मिश्रण केसगळती रोखण्याचे प्रभावी माध्यम आहे. खोबरेल तेल केसांसाठी चांगले आहेच, पण त्याला जर लसुणाची जोड दिली, तर हे मिश्रण केसगळतीची समस्या नक्कीच कमी करू शकते. हे मिश्रण तयार करण्यासाठी लसूणाच्या दोन पाकळ्या बारीक चिरून घ्याव्यात. थोडे खोबरेल तेल हलके गरम करून घेऊन त्यामध्ये चिरलेला लसूण घालावा, आणि पाच ते दहा मिनिटे हे तेल तसेच झाकून ठेवावे. त्यांनतर केसांच्या मुळांशी हळुवार मालिश करीत हे तेल केसांना लावावे आणि किमान अर्धा तास तसेच राहू द्यावे. त्यानंतर नेहमीप्रमाणे केस धुवावेत.

केसगळतीसाठी लसूण आणि मधाचे मिश्रणही उपयुक्त आहे. यासाठी लसूणाच्या आठ ते दहा पाकळ्या ठेचून त्यांचा रस काढून घ्यावा. साधारण दोन मोठे चमचे भरतील इतपत रस असावा. या रसामध्ये एक मोठा चमचा मध मिसळावा. हे मिश्रण चांगले एकजीव करून घ्यावे. केसांच्या मुळांशीही हे मिश्रण मालिश करीत लावावे. हे मिश्रण केसांवर अर्धा तास राहू देऊन बरोबर केसांच्या म सावकाश त्यानंतर केस नेहमीप्रमाणे धुवावेत. केसगळती कमी होण्यासाठी हा उपाय आठवड्यातून दोन वेळा करावा. आले आणि लसुणाची पेस्ट ही केसगळती कमी करण्यासाठी उपयुक्त आहे. यासाठी एक इंच आल्याचे दोन तुकडे, आणि आठ ते दहा लसुणाच्या पाकळ्या एकत्र ठेचून घ्याव्यात. थोडे खोबरेल तेल गरम करून घेऊन त्यामध्ये आले-लसूणाचे वाटण घालावे. हे वाटण तेलामध्ये ब्राऊन होई पर्यंत तेल कढू द्यावे. त्यानंतर तेल आचेवरून बाजूला करून थंड होऊ द्यावे. तेल थंड झाल्यावर गाळून घेऊन एका बाटलीमध्ये भरून ठेवावे. या तेलाने केसांना मालिश केली असता केसगळती कमी होण्यास मदत होते.



# पाकिस्तानला फटकारले

पाकिस्तानला आर्थिक मदत दिली, की तो त्याचा वापर शस्त्रनिर्मितीसाठी आणि अतिरेक्यांना अर्थ पुरवठा करण्यासाठी करतो याचा पुरावाच 'आर्थिक कृती कारवाई पथक' (फायनान्शियल ॲक्शन टास्क फोर्स) या आंतरराष्ट्रीय संस्थेने सादर केला आहे. आपल्या ताज्या अहवालात 'एफएटीएफ'ने २०२० मधील घटनेचा हवाला दिला आहे. त्या वर्षी भारतीय अधिकार्यांनी पाकिस्तानमधील कराचीकडे जाणारा काही माल शोधून काढला. लांब पल्ल्याची क्षेपणास्त्रे बनवण्यासाठी उपयोगात आणता येतील अशा त्या वस्तू होत्या. ज्या वस्तूंची आयात किंवा खरेदी आपण करत आहोत त्या सर्व सामान्य किंवा कल्याणकारी उपयोगाच्या आहेत असे पाकिस्तान भासवतो, प्रत्यक्षात त्यांचा वापर क्षेपणास्त्रे किंवा इतर शस्त्रे बनवण्यासाठी करतो हे त्यावरून उघड होते असे 'एफएटीएफ'च्या ताज्या अहवालात म्हटले आहे. 'दुहेरी उपयोगाच्या वस्तूंची दिशाभूल करणारी माहिती पाकिस्तान देतो' असे त्यात म्हटले आहे. ज्या मालाचा अहवालात उल्लेख आहे तो इस्लामाबादच्या 'नॅशनल डेव्हलपमेंट कॉम्प्लेक्स' या इमारतीत आढळला. या वस्तू म्हणजे 'कागदपत्रे' आहेत असे पाकिस्तान भासवत होता. अण्वस्त्र किंवा क्षेपणास्त्रे बनवण्यासाठी आंतरराष्ट्रीय नियंत्रणांना व नियामकांना चकवण्याचा हा प्रकार होता. इराणला रोखण्यासाठी आणि पश्चिम आशियात आपली लष्करी व हवाई ताकद वाढवण्यासाठी अमेरिकेला पाकिस्तानची गरज आहे. त्यामुळे आंतरराष्ट्रीय संस्था पाकिस्तानला मदत देत आहेत का? या प्रश्नाचे उत्तर शोधले पाहिजे.



नवे निर्बंध आवश्यक

सरकारी किंवा आंतरराष्ट्रीय आर्थिक व्यवहारांवर 'एफएटीएफ' ही संस्था लक्ष ठेवते. विशेषत:अतिरेकी, दहशतवादी संघटना यांना होणार्या आर्थिक पुरवठ्यावर या संस्थेची नजर असते. या संस्थेने प्रतिकूल टिप्पणी केली, तर संबंधित देशास परदेशांतून आर्थिक मदत मिळणे अवघड होते. पाकिस्तानात अतिरेकी संघटना आहेत व त्या आसपासच्या प्रदेशात मुख्यत: भारतात दहशतवादी कृत्ये करतात हे जगास माहीत आहे. आपल्या भूमीचा वापर अतिरेक्यांना करू देऊ नये, यासाठी अमेरिका व अन्य पाश्चात्त्य देश पाकिस्तानवर दडपण आणण्याचा प्रयत्न करत आहेत; पण त्याचा फारसा उपयोग झालेला नाही. राष्ट्रसंघाच्या सुरक्षा समितीने ज्या संघटना व व्यक्तींना अतिरेकी ठरवले आहे, त्या व अन्य अतिरेक्यांविरुद्ध पाकिस्तानने विश्वासार्ह कारवाई करावी, अशी जगाची मागणी आहे. पाकिस्तानी सरकार कधी कधी अतिरेक्यांविरुद्ध कारवाई करतेही; पण जगाचे दडपण निवळले की, कारवाई थंडावते. त्यामुळेच लष्कर ए तोयबा या संघटनेचा मसूद अजहर किंवा झकि उर रेहमान लख्वी असो, हे अतिरेकी पाकिस्तानात उजळ माथ्याने वावरतात. आर्थिक अफरातफरीशी संबंधित जागतिक नियम आणि पाकिस्तानी कारवाईतील पळवाटा शोधून अतिरेक्यांना पैशाचा पुरवठा होत असतो; याचे भरभक्कम पुरावे भारत तसेच दहशतवाद विरोधी लढ्यातील भारताच्या सहकारी देशांनी जमा केले आहेत आणि काही आंतरराष्ट्रीय संस्था, देशांना ते दिलेही आहेत. 'एफएटीएफ'च्या ताज्या अहवालात पहलगाम हल्ल्याचाही उल्लेख आहे. 'पैसे आणि ते अतिरेक्यांकडे पोचवण्याची साधने किंवा मार्ग असल्याशिवाय असे हत्याकांड घडू शकत नाही' असे या अहवालात नमूद केले आहे. याच मुद्द्यावरून पाकिस्तानला मदत न देण्याचे आवाहन भारताने आंतरराष्ट्रीय संस्थांना केले होते. तरीही आंतरराष्ट्रीय नाणे निधी व आशियाई विकास बँकेने काही अब्ज डॉलर्सची मदत पाकिस्तानला दिली. लष्कर ए तोयबा आणि त्या संघटनेशी संलग्न असलेली द रेझिस्टन्स फ्रंट यांच्यासह पाकिस्तानात असलेल्या अतिरेकी संघटनांवर कारवाई करण्याची मागणी भारताने 'एफएटीएफ' तसेच राष्ट्रसंघाच्या अल कायदाशी संबंधित निर्बंध समितीकडे केली. त्यालाही पाकिस्तानच्या या गैर वर्तनाचा आधार आहे. पहलगाम हल्ल्याचे उदाहरण देऊन भारताने पाकिस्तानचा समावेश 'ग्रे लिस्ट' या यादीत करण्याचा आग्रह धरला, तो योग्य आहे. या यादीत आल्यास पाकिस्तानच्या सर्व आर्थिक व्यवहारांची अधिक कसून तपासणी होईल. या यादीत पाकिस्तान २०१८ ते २०२२ या काळात होता. पाकिस्तानवरील दडपण वाढवण्यासाठी त्यावर असे निर्बंध आवश्यक आहेत.

## लैंगिक संवेदना गोठणे

### डॉक्टर टीप्स



मीना आणि सुरेश यांचे संबंध खूप चांगले होते आणि ते एक सुखी, तृप्त आणि भावनिक संतुलन असलेले जोडपे होते. पण एक दिवस सुरेशने आपल्या कुटुंबातील इतर लोकांना सांगितले की तो त्याच्या पत्नीबरोबर राहू इच्छित नाही. या जोडप्याची कथा ऐकल्यानंतर उपचार तज्ञ गोंधळून गेला.

अशा प्रकारे अनेक स्त्रियांच्या बाबतीत होते. बहुतेकांना त्यांच्या मित्रांनी, बरोबरीच्या कर्मचार्यांनी असे सांगितले असते की पुरूषी स्पर्श हा नेहमी सुंदर आणि उत्साहीपणा निर्माण करणारा असतो. आणि त्या तसे मानतात देखील पण त्या जेव्हा जास्त वयाच्या व्यक्तिंशी बोलतात तेव्हा त्यांना असे सांगितले जाते की स्त्रीचे आयुष्य वेदनाकारक असते आणि त्यांना पुरूषांच्या भावनांना की ज्या अनेक वेळा क्लेशदायक असतात, शरण जावेच लागते. **(क्रमशः)**




## विनोद

**शिक्षक :** पंचवीस माणसे एका दिवसात एक हौद पाण्याने भरतात. तर तोच हौद एक माणूस किती दिवसांत भरेल.
विद्यार्थी : पंचवीस दिवस.
**शिक्षक :** आता तू असाच दुसरा प्रश्न सांग.
विद्यार्थी : एक जहाज दहा दिवसांत दुसऱ्या देशात पोहोचते तर दहा जहाजे एक दिवसात पोहोचतील.

## संदेश

teacher:-bahcho aaykar,bikrikar,bhoomikar se milta jolta koi aur shabd batao.
bachcha:-sir ek nahin teen shabd sune hain,sunil gawaskar,sachin tendulkar aur dilip vangaskar.

## सुविचार



व्यक्तीया छायेप्रमाणे विरून जातात, पण राष्ट्र मात्र स्थिर आणि शाश्वत टिकून राहते.


– ई. बुर्क

**संस्कृत सुभाषित**

अतो हास्यतरं लोके किंचिदन्यन्न विद्यते
यत्र दुर्जनमित्याह, दुर्जन: सज्जनं स्वयम्।।
(आदिपर्व, अध्याय ७४, ोक ९५ महाभारत)

स्वत: दुर्जन असणाऱ्याने सज्जनालाच दुर्जन म्हणावे, यापेक्षा हास्यास्पद गोष्ट दुसरी कुठलीच नसेल

# मनोरंजक महाशब्दकोडे



### आडवे शब्द

१. आडपडदा नसलेले (वर्तन)
४. दोन प्रमुख कौरव
९. कौसल्यापुत्र
१०. घरापुढील चारचाकी
११. वाचा
१२. टेकू, आश्रय
१४. अत्यंत गोड
१५. अस्थिर
१७. प्रजा
१९. दुलई
२१. सौंदर्य
२३. नशीब लिहिणारी
२४. लेखणी
२६. संवाद संपल्यावर सुरू होणारा
२८. सामन्यातील पराक्रमी
३०. घाबरलेला, गांगरलेला
३१. धमनी
३३. अवघा, सगळा
३४. भीतीने होणारा कंप
३५. भ्रमर
३६. मनाचे ोक लिहिणारे संत
३८. मगज
४०. शेवट
४२. राजा
४४. मनाची घालमोल, तडफड
४५. लाकडी पादत्राणे
४७. रात्र
४९. दरवाजा
५०. घोड्याचे अंग घासणे
५१. तेजस्वी, राजबिंडा
५२. चौऱ्याऐंशी लक्ष फेऱ्यांनंतर प्राप्त होणारा देह
५४. मला
५५. सुवर्णचंपक
५७. एका बाजूला झुकणे
५८. चर्चा
६०. घाण
६१. पारा लावलेली काच
६२. घुंगरांचा आवाज
६३. पुरुष
६४. आणि
६५. शरीर
६६. आदानची दुसरी बाजू
६७. घाई
७०. पाठीतील हाडांच्या माळेतील एक
७२. थोडे
७४. बहराचे वय
७५. रूंद पान
७६. बारीक मण्यांची माळ
७७. मोबदला

### उभे शब्द

१. मर्यादा, सीमा
२. रम्य
३. कॅप्टन (मराठी)
४. भोपळ्याचा पांढरा प्रकार
५. तगडा, धट्टाकट्टा
६. दु:सह अनुभव, वेदना
७. वाकडा नसलेला
८. नवा जोम
१०. काळ्या रंगाची
१३. चंद्र
१६. निस्तेज
१८. वृक्ष, झाड
२०. शिर्डीचे संत
२२. संत ज्ञानेश्वरांनी लिहिलेली प्रार्थना
२३. मंत्रीमंडळ
२४. युक्ती
२५. दुसऱ्याच्या मनातील विचार ओळखणारा
२६. पातळ खांब
२७. वचक, भीती
२९. लढताना आलेला मृत्यू
३२. लवंगी फटाक्याची माळ
३७. टोळीचा प्रमुख
३९. उन्हाळी पांढरे सुगंधी फूल
४०. राजा कर्णाचे एक नाव
४१. लांब अंतरावर
४३. पुन्हा
४४. फुलणे
४५. अफूचे बी
४६. विल्हेवाट
४८. या दोन टोकांमधील प्रवास म्हणजे आयुष्य
५२. व्यापारातील फायदा
५३. तोटा होईल असे
५४. मनातल्या मनात, मनापासून
५६. नर्तकीचे पैंजण
५८. प्रेमळपणा, आपलेपणा
५९. अंगावरील बारीक केस
६१अ. गुंग, रममाण
६२. अगदी कमी मूल्याचे नाणे
६३. नमस्कार
६८. जमिनीवर घरटे करणारा पक्षी
६९. अजून थोडे
७१. फणसाचा एक प्रकार
७३. स्वच्छंद, मुक्त

### आडवे उत्तरे

१.पारदर्शक ४.दुर्योधन दु:शासन ९.राम १०.कार ११.वाणी १२.आधार १४.मधाळ १५.डळमळीत १७.रयत १९.रजई २१.रुप २३.सटवाई २४.कलम २६.वाद २८.सामनावीर ३०.बावरा ३१.नस ३३.सारा ३४.थरकाप ३५.मधुकर ३६.रामदास ३८.गर ४०.अंत ४२.नरपती ४४.तगमग ४५.खडावा ४७.रजनी ४९.दार ५०.खरारा ५१.राजस ५२.नरतनु ५४.मज ५५.सोनचाफा ५७.पकडणे ५८.मसलत ६०.मळ ६१.आरसा ६२.छमछम ६३.नर ६४.व ६५.तन ६६.प्रदान ६७.त्वरा ७०.मणका ७२.काही ७४.तरुण ७५.पात ७६.सरी ७७.परतावा

### उभे उत्तरे

१.पारावर २.रमणीय ३.कर्णधार ४.दुधी ५.धडधाकट ६.दु:ख ७.सरळ ८.तरतरी १०.काळी १३.रजनीनाथ १६.मलूल १८.तरु २०.साईबाबा २२.पसायदान २३.सरकार २४.करामत २५.मनकवडा २६. वासा २७.दरारा २९.वीरगती ३२.सर ३७.सरदार ३९.मोगरा ४०.अंगराज ४१.दूर ४३.परत ४४.तरारणे ४५.खसखस ४६.वासलात ४८.जननमरण ५२.नफा ५३.नुकसानकारी ५४.मनोमन ५६.चाळ ५८.ममत्व ५९.लव ६१अ.रत ६२.छदाम ६३.नमन ६८.रातवा ६९.आणखी ७१.कापा ७३.स्वैर




## थोडक्यात/ संक्षिप्त

### मुंबई संघाला अजून एक स्टार क्रिकेटर ठोकणार रामराम

मुंबई-भारताच्या अंडर १९ संघाचा माजी कर्णधार आणि स्टार फलंदाज पृथ्वी शॉ याला मागील अनेक वर्षांपासून टीम इंडियात संधी मिळालेली नाही. भारतीय संघासाठी त्याने शेवटचा सामना २५ जुलै २०२१ रोजी खेळला होता. मात्र २५ वर्षांच्या या क्रिकेटरचं देशांतर्गत क्रिकेटमधील करिअर सुद्धा फार चांगलं सुरु नाहीये. त्याच्या फिटनेसवर अनेक प्रश्न उपस्थित करण्यात येत आहेत. असं असतानाच पृथ्वी शॉ देशांतर्गत क्रिकेटमध्ये मुंबई संघाला रामराम ठोकण्याच्या तयारीत आहे. देशांतर्गत क्रिकेटचं पुढील सत्र सुरु होण्यापूर्वी पृथ्वी शॉने मुंबई क्रिकेट असोसिएशनला पात्र लिहून न हरकत पत्र देण्याची विनंती केली आहे.



लिहिलं पत्र: क्रिकेटर पृथ्वी शॉला एका राज्याच्या क्रिकेट असोसिएशनकडून क्रिकेट खेळण्याची ऑफर मिळाली आहे. पृथ्वी शॉने एमसीएला पात्र लिहीत म्हटले की, 'करिअरच्या या टप्प्यावर मला एका दुसऱ्या राज्याच्या क्रिकेट असोसिएशनकडून देशांतर्गत क्रिकेट खेळण्याची ऑफर मिळाली आहे. मला विश्वास आहे की यामुळे मला क्रिकेटपटू म्हणून आणखी विकास आणि प्रगती करता येईल. हे लक्षात घेता, मी तुम्हाला नम्रपणे विनंती करतो की मला ना हरकत प्रमाणपत्र (एनओसी) द्यावे जेणेकरून मी येत्या स्थानिक हंगामात नवीन राज्य संघटनेचे अधिकृतपणे प्रतिनिधित्व करू शकेन'.

फिटनेसचं कारण देऊन काढलं होतं बाहेर :

पृथ्वी शॉला मागच्यावर्षी फिटनेसच्या कारणामुळे रणजी ट्रॉफी सामन्यासाठी मुंबई संघातून बाहेर काढण्यात आलं होतं. टीम मॅनेजमेंटने मुंबई क्रिकेट असोसिएशनला सूचित केलं होतं की, पृथ्वी शॉचं वजन खूप जास्त आहे आणि त्याच्या शरीरात ३५ टक्के चरबी आहे. त्यानं फिटनेस प्राप्त करण्यासाठी खूप ट्रेनिंग करावी असा सल्लाही देण्यात आला होता. परंतु तरीही त्याच्या फिटनेसमध्ये सुधारणा झाली नाही, ज्यामुळे मुंबई संघाचा निवडकर्त्यांनी त्याला विजय हजारे ट्रॉफी २०२४ साठी सुद्धा मुंबई संघात स्थान दिलं नाही.

पृथ्वी शॉचे क्रिकेट करिअर :

पृथ्वी शॉने भारतासाठी ५ टेस्ट, ६ वनडे आणि १ टी २० सामना खेळला आहे. टेस्ट सामन्यात त्याने ४२.३७ च्या ऍव्हरेजने ३३९ धावा केल्या आहेत. ज्यात १ शतक आणि २ अर्धशतकांचा सम ावेश आहे. वनडे आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये त्याने ३१.५० सरासरीने १८९ धावा केल्या आहेत. पृथ्वी शॉने त्याचा शेवटचा लिस्ट ए सामना वर्ष २०२२ च्या विजय हजारे ट्रॉफीमध्ये खेळला होता. त्याने इंग्लिश काउंटी टीम नॉर्थेम्पटनशायरसाठी वनडे सामने खेळले होते त्यात ५ इनिंगमध्ये त्याने ९७, ७२, ९, २३ आणि १७ धावा केल्या होत्या.

****

### केएल राहुलचा क्लास! इंग्लंडमध्ये शतक झळकावताच राहुल द्रविड, सुनील गावस्करांचा मोठा रेकॉर्ड मोडला

लीसड-भारतीय संघ अडचणीत असताना केएल राहुल पुन्हा एकदा भारतीय संघाच्या मदतीला धावून आला आहे. पहिल्या डावात ६ धावांची आघाडी घेतल्यानंतर भारतीय संघाला चांगल्या सुरूवातीची गरज होती. पण यशस्वी जैस्वाल स्वस्तात माघारी परतला.

त्यानंतर केएल राहुलने एक बाजू धरून ठेवली आणि दमदार शतक झळकावलं आहे. या खेळीसह भारतीय संघाने २०० पेक्षा अधिक धावांची आघाडी घेतली आहे.

या शतकी खेळीसह केएल राहुलने सुनील गावस्कर आणि केएल राहुल सारख्या दिग्गज खेळाडूंचा रेकॉर्ड मोडून काढला आहे.तसे पाहायला तर केएल राहुल हा वर्तमान कसोटी भारतीय संघातील सर्वात अनुभवी खेळाडू आहे. विराट कोहली आणि रोहित शम र्च्या निवृत्तीनंतर भारतीय संघाला एक असा फलंदाज हवा होता जो एक बाजू धरून ठेवेल. केएल राहुलने या सामन्यातील पहिल्या डावातही भारतीय संघाला चांगली सुरूवात करून दिली होती. मात्र, ४२ धावा करून त्याला माघारी परतावं लागलं. चांगल्या सुरुवातीचा जैस्वाल, गिल आणि ऋषभ पंतने चांगला फायदा घेतला. या डावात गिल आणि जैस्वाल स्वस्तात माघारी परतले. पण केएल राहुल खंबीरपणे उभा राहिला आणि आपले शतक पूर्ण केले.हे केएल राहुलचे कसोटी क्रिकेटमधील ९ वे शतक ठरले आहे. तर इंग्लंडमध्ये सलामीवीर फलंदाज म्हणून ३ शतकं झळकावणारा तो पहिलाच भारतीय सलामीवीर फलंदाज ठरला आहे. या रेकॉर्डमध्ये त्याने सुनील गावस्कर, राहुल द्रविड, विजय मर्चंट आणि रवी शास्त्री या दिग्गज खेळाडूंचा रेकॉर्ड मोडून काढला आहे.

या दिग्गजांच्या नावे इंग्लंडमध्ये कसोटी क्रिकेटमध्ये सलामीवीर फलंदाज म्हणून २ शतके झळकावण्याची नोंद आहे.केएल राहुल –३, सुनील गावसकर –२, राहुल द्रविड –२ विजय मर्चंट – २, रवी शास्त्री –२ , भारतीय संघ मजबूत स्थितीत । डावात भारतीय संघ ६ धावांची आघाडी घेऊन मैदानात उतरला.

भारतीय संघाकडून सलामीला आलेला यशस्वी जैस्वाल अवघ्या ४ धावा करत माघारी परतला. साई सुदर्शनने ३० धावांची खेळी केली. तर कर्णधार शुबमन गिल ८ धावांवर तंबूत परतला.

# ओली पोपच्या शतकाने इंग्लंडला सावरले

हेडिंग्ले : बॉर्डर गावसकर चषकामध्ये जसप्रीत बुमरा एकामागून एक फलंदाज बाद करत होता. दुसरीकडे, इतर भारतीय गोलंदाज सतत संघर्ष करत होते. आता इंग्लंड कसोटी मालिकेपूर्वी सामन्याच्या दुसर्या दिवशीही असेच काहीसे दिसून आले. दुसर्या दिवशी भारतीय संघाकडून जसप्रीत बुमराहने तीन बळी घेतल्या. दुसर्या दिवसाचा खेळ संपेपर्यंत इंग्लंडने १० फलंदाज गमावून ४६५ धावा केल्या. पहिल्या डावात ते अजूनही ६ धावांनी मागे आहेत. बुमराच्या अचूक आणि धारदार मार्यामुळे इंग्लंडला सुरुवातीलाच हादरा बसला, मात्र नंतर बेन डकेट (६२) आणि ओली पोपने (१०६) डाव सावरला. विशेष म्हणजे पोपने शतक झळकावून भारतीय गोलंदाजांची झोप उडवली. त्यानंतर मधल्या फळीतील इंग्लंडचे फलंदाज हॅरी ब्रुक याने ९९ धावा केल्या. त्याचे शतक अवघ्या १ धावेने हुकले. त्याला साथ देणारा रुट २८ धावांवर बाद झाला. त्याला बुमरा



याने शानदार गोलंदाजी करत करूण नायरकडे झेलबाद केले. त्यानंतर स्टोक्स हा २० धावांवर असताना त्याला सिराज याने पंतकडे झेलबाद केले. जेमी स्मिथ याने ४० धावा केल्या. प्रसिद्ध याने साई सुदर्शनकडे त्याला झेलबाद केले. वोक्स हा ३८ धावांवर तर ब्रायडन कार्से हा २२ धावांवर बाद झाले. टँग याने ११ धावांवर असताना बुमरा याने त्याचा त्रिफळा उडविला. शोएब बशीर हा १ धावेवर नाबाद राहिला. ३४ अवांतर धावा इंग्लंडला मिळाल्या. दुसर्या दिवशी भारतीय संघाने ३५९/३ च्या धावसंख्येवरून पुढे खेळायला सुरुवात केली होती. शुभमन गिलने पहिल्याच दिवशी शतक पूर्ण केले होते, तर ऋषभ पंतने दुसर्याच दिवशी त्याच्या कसोटी कारकिर्दीतील सातवे शतक झळकावले. यासह, पंत एमएस धोन-ीला मागे टाकत कसोटीत सर्वाधिक शतके करणारा भारतीय यष्टीरक्षक ठरला.

करुण नायर ८ वर्षांनी भारतीय संघात परतला आहे, पण तो खातेही उघडू शकला नाही. एकेकाळी भारतीय संघाने ३ बळी गमावत ४३० धावा केल्या होत्या, परंतु त्यानंतर बळींची माळ सुरू झाली आणि भारतीय पुढील ७ बळी ४१ धावांच्या आत गमावल्या. इंग्लंडचा कर्णधार बेन स्टोक्स व्यतिरिक्त, जोश टंगने आपल्या गोलंदाजीने कहर केला.

स्टोक्स आणि टंगने दोघांनीही प्रत्येकी चार बळी घेतल्या. भारताने इंग्लंडविरुद्ध पहिल्या डावात ४७१ धावा केल्या होत्या. इंग्लंडचा संघ फलंदाजीसाठी आला, तेव्हा जसप्रीत बुमराने पहिल्याच षटकात भारतीय संघाला पहिले यश मिळवून दिले. झॅक क्रॉली फक्त ४ धावा काढून पॅव्हेलियनमध्ये परतला. त्यानंतर, बेन डकेट आणि ऑली पोप यांच्यात १२२ धावांची अशी भागीदारी झाली की भारतीय गोलंदाज बळीसाठी आसुसले. अखेर २८ व्या षटकात बुमराहने भारताला ब्रेकथ्रू दिला, त्याने ६२ धावांवर डकेटला त्रिफळाबाद केले. जसप्रीत बुमराने आणखी २ संधी निर्माण केल्या, परंतु यशस्वी जैस्वाल आणि रवींद्र जडेजा यांच्या चेंडूंवर प्रत्येकी एक झेल सोडला. प्रसिद्ध कृष्णा खूप महागडा ठरला, दुसरीकडे, सिराजने काही संधी निर्माण केल्या, पण त्याला एकही बळी घेता आली नाही. बुमराने भारतीय संघासाठी तिन्ही बळी घेतल्या.

संक्षिप्त धावफलक

इंग्लंड : ओली पोप १०६, डकेट ६२, क्रावली ४, रूट २८, ब्रुक ९९, स्टोक्स २०, जेमी स्मिथ ४०, वोक्स ३८, ब्रायडन कार्से २२, टंग ११, बशीर १ एकूण १००.४ षटकांत ४६५/१०

### यशस्वी जैस्वालने सगळ्यात जास्त कॅच सोडले, दिग्गज संतापले

लीसड-भारताचा स्टार वेगवान गोलंदाज जसप्रीत बुमराहबद्दल आपण काय म्हणू शकतो... जेव्हा जेव्हा संघ अडचणीत असतो तेव्हा तेव्हा कर्णधार विचार न करता बुमराहला चेंडू देतो आणि तो कधीही नाराज करत नाही. हेडिंग्ले कसोटीच्या पहिल्या डावातही असेच दिसून आले. जसप्रीत बुमराहची जादू चालली आणि इंग्लिश फलंदाजांनी गुडघे टेकले.

लीड्समधील हेडिंग्ले येथे सुरू असलेल्या कसोटीच्या पहिल्या डावात जसप्रीत बुमराहने ५ विकेट घेतले. पण, यशस्वी जैस्वाल आणि रवींद्र जडेजा यांनी अनेक वेळा त्याला नाराज केले. बुमराहच्या चेंडूवरून ४ झेल सोडले.

तीन वेळा ही चूक जैस्वालने केली आणि एका प्रसंगी जगातील सर्वोत्तम क्षेत्ररक्षकांपैकी एक असलेल्या जडेजानेही एक सोपा झेल सोडला. यार भारताचे अनेक दिग्गज संतापले. पण, हे सर्व असूनही बुमराहने आपला संयम गमावला नाही आणि तो रागा-वलेला दिसला नाही.

आपण क्रिकेटच्या मैदानावर अनेकदा पाहिले आहे की झेल चुकवल्यानंतर गोलंदाज आपला राग गमावून क्षेत्ररक्षकावर रागा-वतो, पण जसप्रीत बुमराह तसा नाही. तो म्हणाला की, ''मला क्रिकेट खेळायला खूप आवडतं. मी जेव्हा मैदानावर असतो, तेव्हा त्या क्षणांचा पुरेपूर आनंद घेतो, आणि म्हणूनच माझ्या चेहऱ्यावर नेहमी हास्य असतं. जेव्हा कधी झेल सुटतो

तेव्हा मी समजून घेतो की कोणताही खेळाडू मुद्दाम असं करत नाही. प्रत्येक जण आपलं सर्वोत्तम देण्याचा प्रयत्न करत असतो. थंड हवामानात अनेकदा चेंडूवर लक्ष केंद्रित करणं कठीण जातं, आणि ही गोष्ट मला माहीत आहे.''जसप्रीत बुमराह पुढे म्हणाला की, सामन्यात हे सर्व घडते आणि मी माझ्या भविष्यातील स्पेलवर त्याबद्दल विचार करून परिणाम होऊ देऊ इच्छित नाही. मी शक्य तितक्या लवकर या गोष्टी विसरून जाण्याचा प्रयत्न करतो.

जसप्रीत बुमराहने हेडिंग्ले कसोटीच्या पहिल्या डावात ५ बळी घेऊन इतिहास रचला. त्याने माजी भारतीय स्टार अष्टपैलू कपिल देव यांच्याशी बरोबरी केली, ज्यांनी घराबाहेर १२ बळी घेतले होते. बुमराहने आता परदेशातही १२ पाच बळी घेतले आहेत.

# अंपायर की इंग्लंडचा १२वा खेळाडू?

## हेडिंग्ले कसोटीत पंचाचा टीम इंडियावर पक्षपात? पंत अन् गिलने व्यक्त केली नाराजी

लीडस-भारत आणि इंग्लंड यांच्यात लीड्सच्या हेडिंग्ले मैदानावर सुरू असलेल्या पहिल्या कसोटी सामन्याने आता खऱ्या अर्थाने रंगत पकडली आहे. तिसऱ्या दिवशी दोन्ही संघांच्या पहिल्या डावांचा खेळ संपुष्टात आला असून, भारताने फक्त ६ धावांची लहानशी आघाडी मिळवली आहे.

भारताने पहिल्या डावात दमदार फलंदाजी करत ४७१ धावा केल्या. यामध्ये युवा फलंदाज शुभमन गिल, यशस्वी जैस्वाल, आणि ऋषभ पंत यांचे शतक निर्णायक ठरले. दुसरीकडे, इंग्लंडनेही भारताला टक्कर देत आपल्या पहिल्या डावात ४६१ धावा केल्या. परंतु या सामन्यादरम्यान आणखी एक बाब चर्चेत आली आहे आणि ती म्हणजे चेंडू बदलण्याबाबत पंचांचा दृष्टिकोन, ज्यामुळे भारतीय खेळाडू मैदानावर स्पष्टपणे रागावलेले दिसून आले. चेंडू बदलण्यावरून पंत आणि गिल संतापले....

इंग्लंडच्या पहिल्या डावात भारतीय खेळाडूंनी पंचांना अनेक वेळा चेंडू बदलण्यास सांगितले, परंतु पंच क्रिस गॅफनी प्रत्येक वेळी तो नाकारताना दिसले. उपकर्णधार ऋषभ पंत देखील पंचांना चेंडूबद्दल दाखवताना दिसले, परंतु पंचांनी तरीही त्यांचा निर्णय बदलला नाही. यावर पंत इतका संतापला की त्याने रागाच्या



भरात चेंडू मैदानावर फेकला.

त्याच वेळी, कर्णधार शुभमन गिल आणि वरिष्ठ वेगवान गोलंदाज जसप्रीत बुमराह यांनीही पंचांना असेच आवाहन केले, परंतु त्यांचे म्हणणेही पंचांनी दुर्लक्षित केले. खेळाडूंनी सांगितले की चेंडू आता स्विंग होत नाही आणि त्याचा आकारही खराब झाला आहे, म्हणून तो बदलणे आवश्यक होते.

आतापर्यंत सामन्याची स्थिती काय आहे? भारताला जिंकण्याची संधी...

तीन दिवसांच्या खेळानंतर सामना बरोबरीत सुरू आहे, परंतु सध्या भारतीय संघ थोडा पुढे असल्याचे दिसते. टीम इंडियाने त्यांच्या दुसऱ्या डावात तिसऱ्या दिवशी खेळ संपेपर्यंत २ विकेट गमावून ९० धावा केल्या आहेत आणि ९६ धावांची आघाडी मिळवली आहे.

कर्णधार शुभमन गिल आणि केएल राहुल सध्या क्रीजवर आहेत आणि जर भारताने चौथ्या दिवशी चांगली फलंदाजी केली, तर ही आघाडी सहजपणे ३०० धावांच्या पुढे जाऊ शकते. ज्यामुळे दुसऱ्या डावात इंग्लंडला मोठे लक्ष्य देणे शक्य होईल. २०२१ नंतरच्या पहिल्या विजयाची वाट पाहत आहे. भारताने २०२१ मध्ये इंग्लंडम ध्ये शेवटचा कसोटी सामना जिंकला होता, त्यावेळी संघाचे नेतृत्व विराट कोहलीच्या हाती होते. इंग्लंडविरुद्धच्या मालिकेपूर्वी कोहलीने कसोटी क्रिकेटमधून निवृत्तीची घोषणा केली. त्यानंतर, संघाची कमान शुभमन गिलकडे सोपवण्यात आली.

# इंडियाला पहिल्याच षटकात मोठा धक्का; कर्णधार स्वस्तात बाद

लीड्स-भारत आणि इंग्लंड क्रिकेट संघाती ५ सामन्यांच्या कसोटी मालिकेतील पहिला सामना लीड्सम धील हेडिंग्ले क्रिकेट मैदानावर खेळ-ला जात आहे. आज (२३ जून) या सामन्याचा चौथा दिवस आहे. पण भारतासाठी दिवसाची सुरुवात चांगली झाली नाही आणि कर्णधार गिल ८ धावा करुन बाद झाला. दिवसाच्या पहिल्याच षटकांत कार्सेनं गिलला बाद केलं. यासह भारताच्या तीन विकेट पडल्या असून भारताची आघाडी १०० धावांपेक्षा जास्त आहे. केएल रा-हुल आणि ऋषभ पंत ही जोडी सध्या मैदानावर आहे.

जसप्रीत बुमराहनं घेतल्या पाच विकेट्स : यापूर्वी, इंग्लंडविरुद्धच्या पहिल्या डावात जसप्रीत बुमराहनं शानदार गोलंदाजी केली आणि तो सर्वात मोठा हिरो असल्याचं सिद्ध झालं. त्यानं पाच विकेट घेतल्या. यासह, तो सेना देशांम ध्ये सर्वाधिक विकेट्स घेणारा आशियाई गोलंदाज बनला. त्याच्याशिवाय प्रसिद्ध कृष्णानं दोन विकेट घेतल्या. मोहम्मद सिराजनं दोन विकेट घेतल्या. इंग्लंडनं पहिल्या डावात ४६५ धावा केल्या. तर टीम इंडियानं पहिल्या डावात ४७१ धावा केल्या होत्या. पहिल्या डावाच्या आधारावर भारतीय संघाला ६ धावांची थोडीशी आघाडी मिळाली.



हेडिंग्ले इथं किती धावांचा पाठलाग यशस्वी : लीड्समधील हेडिंग्ले मैदानावर सर्वाधिक यशस्वी धावांचा पाठलाग करण्याचा विक्रम ऑस्ट्रेलियन संघाच्या नावावर आहे. १९४८ मध्ये ऑस्ट्रेलियानं इंग्लंडविरुद्ध ४०४ धावांचं लक्ष्य गाठलं होतं. त्यानंतर २०१९ मध्ये इंग्लंड संघानं ऑस्ट्रेलियाविरुद्ध ३६२ धावांचं लक्ष्य गाठलं होतं. आतापर्यंत या मैदानावर कसोटी क्रिकेटमध्ये फक्त चार वेळा ३०० पेक्षा जास्त धावांचं लक्ष्य गाठण्यात आलं आहे.

भारताकडून तीन शतकं : तत्पूर्वी, नाणेफ ेक गमावून प्रथम फलंदाजी केल्यानंतर, भारतीय संघानं पहिल्या डावात ४७१ धावा केल्या. कर्णधार शुभमन गिलनं २२७ चेंडूत १९ चौकार आणि एका षटकाराच्या मदतीनं १४७ धावा केल्या. तर विकेटकीपर फलंदाज ऋषभ पंतनं १७८ चेंडूत १३४ धावांची खेळी केली. पंतनं त्याच्या खेळीत १२ चौकार आणि ६ षटकार मारले. सलामीवीर यशस्वी जैस्वालनंही १५९ चेंडूत १६ चौकार आणि एका षटकाराच्या मदतीनं १०१ धावांचं योगदान दिलं. इंग्लंडकडून कर्णधार बेन स्टोक्स आणि जोश टंग यांनी प्रत्येकी चार विकेट घेतल्या.

सामन्यासाठी दोन्ही संघांची प्लेइंग ११ :भारत : केएल राहुल, यशस्वी जैस्वाल, साई सुदर्शन, शुभमन गिल (कर्णधार), ऋषभ पंत (उपकर्णधारविकेटकीपर), करुण नायर, रवींद्र जडेजा, शार्दुल ठाकूर, मोहम्मद सिराज, जसप्रीत बुम राह आणि प्रसीध कृष्णा.

इंग्लंड : जॅक क्रॉली, बेन डकेट, ऑली पोप, जो रूट, हॅरी ब्रूक, बेन स्टोक्स (कर्णधार), जेमी स्मिथ (यष्टिरक्षक), ख्रिस वोक्स, ब्रायडन कार्स, जोश टंग आणि शोएब बशीर.

### पहिल्याच सामन्यात प्रिंसच्या कर्णधारपदावर लागला कलेक

लीड्स-शुभमन गिलने टीम इंडियाचा कसोटी कर्णधार होताच शतक झळकावलं असेल, पण जेव्हा मैदानावर कर्णधारपदाचा प्रश्न येतो तेव्हा तो अपयशी ठरल्याचं दिसून येतं. विराट कोहलीनं त्याच्या संपूर्ण कर्णधार कारकिर्दीत जे केलं नाही, अजिंक्य रहाणेला फक्त एकदाच अशा दिवसाचा सामना करावा लागला आणि रोहित शर्मानं त्याच्या कर्णधारपदाच्या काळात फक्त चार वेळाच जे होऊ दिलं, ते शुभमन गिलच्या बाबतीत त्याच्या पहिल्याच साम न्यात घडलं. कुठंतरी शुभमनला याचा पुन्हा एकदा विचार करावा लागेल, अन्यथा या मालिकेतील आगामी सामने खूप कठीण होणार आहेत.पहिल्या डावात टीम इंडियाला फक्त सहा धावांची आघाडी : इंग्लंडविरुद्धच्या पहिल्या कसोटी सामन्यात भारतीय संघ फलंदाजीसाठी उतरला तेव्हा संघानं ४७१ धावा केल्या. पण इंग्लंडनंही उत्तम पुनरागमन केलं. इंग्लंडनं ४६५ धावा केल्या. इंग्लंडचा संघ भारतापेक्षा फक्त ६ धावांनी मागे राहिला. इंग्लंड संघ इतक्या धावा करेल अशी अपेक्षा नव्हती, परंतु शुभमन गिलच्या खराब कर्णधारपदामुळं आणि टीम इंडियाच्या खराब क्षेत्र-क्षणामुळं संघानं मोठी धावसंख्या उभारली.पहिल्याच सामन्यात विरोधी संघानं केल्या ४५० पेक्षा जास्त : आता रेकॉर्डबद्दल बोलायचं झालं तर २०१५ पासून आतापर्यंत, म्हणजेच गेल्या १० वर्षांत, फक्त ६ वेळा असं घडलं आहे की सात देशांमध्ये विरोधी संघानं टीम इंडियाविरुद्ध ४५० पेक्षा जास्त धावा केल्या आहेत. अजिंक्य रहाणेच्या नेतृत्वाखाली असं एकदा घडलं आहे. रोहित शर्माच्या नेतृत्वाखाली हे चार वेळा घडलं आहे आणि आता शुभमन गिलच्या नेतृत्वाखाली एकदा घडलं आहे. म्हणजेच, विराट कोहलीच्या नेतृत्वाखाली भारतीय संघानं २०१५ नंतर आंतरराष्ट्रीय देशांमध्ये ४५० पेक्षा जास्त धावा केल्या नाहीत. पण शुभमन गिलनं त्याच्या पहिल्याच सामन्यात हा दिवस पाहिला आहे, ही चिंतेची बाब ठरु शकते.

# कसोटी सामन्याहॅरी ब्रुकचे शतक हुकले

हेडिंग्ले : भारत वि. इंग्लंड पहिल्या कसोटी सामन्याच्या तिसर्या दिवसाचा खेळ सुरू झाला आहे. भारताने पहिल्या डावात ४७१ धावा केल्या आहेत. शतकवीर ऑली पोप आणि हॅरी ब्रुक ही जोडी दुसर्या दिवशी नाबाद माघारी परतला. हॅरी ब्रुक ९९ धावांवर खेळत असताना प्रसिध कृष्णा गोलंदाजीसाठी आला आणि त्याने षटकातील तिसर्या चेंडूवर ब्रुकला झेलबाद केले. प्रसिध कृष्णाने ब्रुकला चेंडू खेळायला भाग पाडले आणि बॅटची वरची कड लागत चेंडू हवेत गेला आणि सीमारेषेवर शार्दुल ठाकूरने एक सोपा झेल टिपला. यासह इंग्लंडने सातवी आणि महत्त्वाची विकेट गमावली आहे. इंग्लंडने आता ४६५ धावांचा टप्पा गाठला आहे. मैदानावर ख्रिस वोक्स कायम आहे, जो संघाचा डाव सावरत आहे.

प्रसिध कृष्णाने लंचब्रेकनंतर संघाला सहावी विकेट मिळवून दिली आहे. प्रसिधच्या पहिल्या चेंडूवर जेमी स्मिथने षटकार खेचला. त्यानंतर दुसर्या चेंडूवर कट लागून झेलबाद झाल्याचं अपील केलं, संघाने रिव्ह्यूही केला पण स्मिथ नाबाद राहिला. त्यानंतर प्रसिधने तिसरा चेंडू बाऊन्सर टाकला आणि सीमारेषेजवळ जडेजा आणि साई सुदर्शनने रिले झेल टिपत मोठी विकेट मिळाली.इंग्लंडने लंचब्रेकपर्यंत ५ विकेट्स गमावत ३२७ धावा केल्या आहेत. तिसर्या दिवशी इंग्लिश संघाने २८ षटकांत ११८ धावा केल्या. तर भारतीय संघाला २ विकेट्स घेता आल्या.



# महाव्यवस्थापक व मध्य रेल्वेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी पुणे व सोलापूर विभागातील खासदारांसोबत बैठक संपन्न

**सोलापूर/प्रतिनिधी** : मध्य रेल्वेचे महाव्यवस्थापक श्री धरम वीर मीना, प्रधान विभाग प्रमुख तसेच पुणे व सोलापूर विभागाचे विभागीय रेल्वे व्यवस्थापक यांच्या सोबत दिनांक २३.०६.२०२५ रोजी पुणे येथील विभागीय रेल्वे व्यवस्थापक कार्यालयातील हॉलमध्ये पुणे व सोलापूर विभागातील माननीय खासदारांसोबत बैठक घेण्यात आली.



या बैठकीस माननीय खासदार सौ. सुप्रिया सुळे (बारामती), श्री श्रीरंग अप्पा बारणे (मावळ), श्री ओमप्रकाश भूपालसिंगराजे निंबाळकर (धाराशिव), श्री धैर्यशील राजसिंह मोहिते पाटील (माढा), डॉ. अमोल रामसिंग कोल्हे (शिरूर), श्री भाऊसाहेब राजाराम वाकचौरे (शिर्डी), श्री निलेश ज्ञानदेव लंके (अहमदनगर), श्री विशालदादा प्रकाशबापू पाटील (सांगली), सौ. रजनी अशोकराव पाटील (बीड), श्री नितीन लक्ष्मणराव जाधव पाटील (सातारा), श्री शिवाजी बंडप्पा काळगे (लातूर), सौ. माया नारोलिया (होशंगाबाद) आणि सौ. मेधा कुलकर्णी (राज्यसभा पुणे) यांनी उपस्थिती दर्शविली.

सर्वानुमते माननीय खासदार सौ. सुप्रिया सुळे यांची या समितीच्या अध्यक्षा म्हणून निवड करण्यात आली.

या आधी महाव्यवस्थापक श्री धरम वीर मीना यांनी सर्व माननीय खासदारांचे शाल व श्रीफळ देऊन स्वागत केले. आपल्या स्वागतपर भाषणात श्री धरम वीर मीना यांनी प्रकल्पांच्या यशस्वी पूर्णतेसाठी मिळालेल्या सहकार्याबद्दल व प्रेरणेसाठी माननीय खासदारांचे आभार मानले व त्यांच्या मार्गदर्शनाखाली प्रवाशांना आणखी चांगल्या सुविधा देण्याचा विश्वास व्यक्त केला. तसेच त्यांनी मध्य रेल्वेच्या यशस्वी कामगिरीबद्दल सांगितले पुरस्कारांच्या स्वरूपात मिळालेल्या प्रतिष्ठित जी. बी. पंत शिल्ड आणि पहिल्या आणि दुसऱ्या इनोव्हेशन पुरस्कारांवरही प्रकाश टाकला.

या बैठकीचे संचालन मध्य रेल्वेचे उपमहाव्यवस्थापक श्री के. के. मिश्रा यांनी केले. पुणे विभागाचे विभागीय रेल्वे व्यवस्थापक श्री राजेश कुमार वर्मा व सोलापूर विभागाचे विभागीय रेल्वे व्यवस्थापक श्री सुजीत मिश्रा यांनी आपल्या-आपल्या विभागातील यशस्वी प्रगती व उपक्रमांबाबत सविस्तर सादरीकरण केले.

माननीय खासदारांनी त्यांच्या मतदारसंघातील विविध मागण्या मांडल्या तसेच प्रवाशांच्या सोयीसाठी राबविण्यात येणाऱ्या योजनांसाठी व रेल्वेने सुरू केलेल्या अमृत भारत स्टेशन योजना, वंदे भारत एक्सप्रेस, अमृत भारत एक्सप्रेस व विशेष गाड्यांसाठी रेल्वेचे कौतुक केले. यावेळी उपस्थित माननीय खासदारांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांची समाधानकारक उत्तरे देण्यात आली व प्रवासी सुविधांमध्ये सुधारणा करण्यासाठी त्यांच्या सूचना अमलात आणण्याचे आश्वासन देण्यात आले.

# विश्वेश्वरय्याचे ८८३ विद्यार्थी ६० टक्के पेक्षा अधिक गुण घेऊन उत्तीर्ण

## ४१ विद्यार्थी ९० टक्के पेक्षा अधिक गुण घेऊन उत्तीर्ण तर ५२१ विद्यार्थी विशेष प्राविण्यासह

**औसा/प्रतिनिधी** : तालुक्यातील आलमला येथील विश्वेश्वरय्या इन्स्टिटयुट ऑफ इंजिनीअरिंग ॲण्ड टेक्नॉलॉजी महाविद्यालयाचा महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाने घेतलेल्या उन्हाळी परीक्षा २०२५ चा निकाल घोषित झाला असून महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी उज्वल यशाची परंपरा कायम ठेवत महाविद्यालयातील अंतिम वर्षातील विद्यार्थ्यांनी नेत्रदिपक यश संपादन केले आहे. महाविद्यालयातुन ४१ विद्यार्थी ९० टक्केपेक्षा अधिक गुण घेऊन उत्तीर्ण झाले आहेत तर विशेष प्राविण्यासह ५२१ विद्यार्थी उत्तीर्ण तर प्रथम श्रेणीत ८८३ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. महाविद्यालयाचा अंतीम वर्षाचा निकाल १०० टक्के लागला आहे. कौस्तुभ पवार ९४.७१ टक्के गुण घेऊन महाविद्यालयातुन प्रथम आला आहे.

इन्फॉर्मेशन टेक्नॉलाजी प्रथम वर्षातुन कौस्तुभ पवार ९४.७१ टक्के गुण घेऊन प्रथम, इरफान शेख ९२.२४ टक्के गुण घेऊन व्दितीय तर अभय काळे ९०.३५ टक्के गुण घेऊन तृतीय आला आहे. इन्फॉर्मेशन टेक्नॉलाजी व्दितीय वर्षातुन श्रुती सुर्यवंशी ९१.६५ टक्के गुण घेऊन प्रथम, दिक्षा चौधरी ९०.७१ टक्के गुण घेऊन व्दितीय तर स्नेहा लोमटे ८९.६५ टक्के गुण घेऊन तृतीय आला आहे. इन्फॉर्मेशन टेक्नॉलाजी अंतीम वर्षातुन मो. युसुफ चौधरी ९३.३३ टक्के गुण घेऊन प्रथम, सुमित शिंदे ९१.६० टक्के गुण घेऊन व्दितीय तर राघव देशपांडे ९१.४७ टक्के गुण घेऊन तृतीय आला आहे. तसेच अजमिरलाल शेख ९०.६७ टक्के, अर्जुन गुडले ९०.२७ टक्के, अफफान पठाण ९० टक्के, अथर्व चांगलेरकर ८९.७३ टक्के गुण घेऊन उत्तीर्ण झाले आहेत. कॉम्पयुटर इंजिनिअरिंग प्रथम वर्षातुन श्रृष्टी म्हेत्रे ९१.१८ टक्के गुण घेऊन प्रथम, महादेवी दळवे ८९.७७ टक्के गुण घेऊन व्दितीय तर विद्या कलमे ८९.६५ टक्के गुण घेऊन तृतीय आला आहे. व्दितीय वर्षात संध्या आळणे ९०.७१ टक्के गुण घेऊन प्रथम, कृष्णा पाटील ८९.१८ टक्के गुण घेऊन व्दितीय तर राज कांबळे ८८.९४ टक्के गुण घेऊन तृतीय आला आहे. अंतीम वर्षातुन स्वप्निल मिरखले ९३.२६ टक्के गुण घेऊन प्रथम, स्मृती गाढवे ९१.७७ टक्के गुण घेऊन व्दितीय तर गणेश घोडके ९१.७१ टक्के गुण घेऊन तृतीय आला आहे. तसेच शंकर कांबळे ९१.६६ टक्के, जान्हवी कुलकर्णी ९१.५४ टक्के, प्रेरणा साळुंके ९१.४९ टक्के, श्रीनिवास घुले ९१.०९ टक्के, प्रणिता पाटील ९०.८६ टक्के, श्रध्दा पाटील ९०.२९ टक्के, साक्षी स्वामी ९० टक्के गुण घेऊन उत्तीर्ण झाले आहेत.

सिव्हील इंजिनीअरिंग अंतीम वर्षातुन प्रतिक मोरे ९२.२१ टक्के गुण घेऊन प्रथम, अनिकेत वागन्ना ९१.४२ टक्के गुण घेऊन व्दितीय तर प्रशिक अष्टेकर ९१.१६ टक्के, अमर नवने ९१.०५, अमित कदम ९०.८९, गजानन सागर ९०.२६, प्रसाद कल्याणी ८९.७९, विश्वजित वडीले ८९.७४, राधा चांदुरे ८९.४२, वेदश्री टेंकाळे ८९.१६ टक्के गुण घेऊन उत्तीर्ण झाले आहेत. व्दितीय वर्षामधुन यशराज कानडे ९०.६७ टक्के गुण घेऊन प्रथम, असिम शेख ८९.८९ टक्के गुण घेऊन व्दितीय तर रोहन जाधव ८८.७८ टक्के गुण घेऊन उत्तीर्ण झाले आहेत. प्रथम वर्षातुन शौर्य जावळे ८९.२२ टक्के गुण घेऊन प्रथम, रामराजे जगताप ८७.०० टक्के गुण घेऊन व्दितीय तर योगिनी कोकाटे ८६.५६ टक्के गुण घेऊन तृतीय आली आहे. इलेक्ट्रॉनिक्स ॲण्ड टेलिकम्युनिकेशन इंजिनीअरिंग अंतीम वर्षातुन प्रज्ञा क्षिरसागर ९३.९४ टक्के गुण घेऊन प्रथम, श्रेया निटुरे ९१.२६ टक्के गुण घेऊन व्दितीय तर पद्मजा मलवाडे ९०.६७ टक्के गुण घेऊन तृतीय आली आहे. तसेच अनिकेत पांढरे ९०.३२ टक्के, अंजली झोडगे ८९.७३ टक्के, प्रिती सुर्यवंशी ८८.८९ टक्के गुण घेऊन उत्तीर्ण झाले आहेत. व्दितीय वर्षातुन मानसी घोगरे ८९.२२ टक्के गुण घेऊन प्रथम, ओंकार गोरे ८७.६७ टक्के गुण घेऊन व्दितीय तर स्वप्निल आगळे ८७.४४ टक्के गुण घेऊन तृतीय आला आहे. प्रथम वर्षातुन स्नेहा सोमवंशी ८८.१२ टक्के गुण घेऊन प्रथम, अमर मेंढोळे, कृष्णा गरड अनुक्रमे ८७.०६ टक्के गुण घेऊन व्दितीय तर पुनम चव्हाण ८६.२२ टक्के गुण घेऊन तृतीय आली आहे.

इलेक्ट्रीकल इंजिनीअरिंग अंतीम वर्षातुन कृष्णा दैवतराज ९३.८८ टक्के गुण घेऊन प्रथम, तुकाराम जाधव ९२.०० टक्के गुण घेऊन व्दितीय तर वैभवी गायकवाड ९१.०० टक्के गुण घेऊन तृतीय आली आहे. इलेक्ट्रीकल इंजिनीअरिंग व्दितीय वर्षातुन रोहित महामुनी ८३.८८ टक्के गुण घेऊन प्रथम, श्रेया म्हाळगी ८२.८२ टक्के गुण घेऊन व्दितीय तर शिवम शिंदे ८२.१२ टक्के गुण घेऊन तृतीय आली आहे. प्रथम वर्षामधुन सुधीर बनसोडे ८७.२९ टक्के गुण घेऊन प्रथम, समीना मुल्ला ८७.१८ टक्के गुण घेऊन व्दितीय तर नम्रता कदम ८१.४१ टक्के गुण घेऊन तृतीय आला आहे.

मेकॅनिकल इंजिनीअरिंग अंतीम वर्षातुन अमित कोटे ९२.२२ टक्के गुण घेऊन प्रथम, कौस्तुभ तिघीले ८९.६७ टक्के गुण घेऊन व्दितीय तर साक्षी मोहिते ८८.४४ टक्के गुण घेऊन तृतीय आला आहे. मेकॅनिकल इंजिनीअरिंग व्दितीय वर्षातुन नागेश जावळे ८५.६७ टक्के गुण घेऊन प्रथम, सुर्यकर पुंडलीक ८३.२२ टक्के गुण घेऊन व्दितीय तर अजिंक्य जाधव ८१.७८ टक्के गुण घेऊन तृतीय आला आहे. प्रथम वर्षातुन प्रशांत नरवडे ८६.४४ टक्के गुण घेऊन प्रथम, अनिकेत कुलकर्णी ८४.६७ टक्के गुण घेऊन व्दितीय तर अदित्य यादव ८४.०० टक्के गुण घेऊन तृतीय आला आहे.

या सर्व यश संपादन केलेल्या विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष शिवचरण धाराशिवे, उपाध्यक्ष प्रभाकर कापसे, सचिव बसवराज धाराशिवे, सहसचिव महादेव खिचडे, विश्वेश्वरय्या इन्स्टिटयुट ऑफ इंजिनीअरिंग ॲण्ड टेक्नॉलॉजी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रशांत धाराशिवे, उपप्राचार्य गोपाळ दंडिमे, विभाग प्रमुख रेवणसिध्द बुक्का, प्रविण साबदे, मंगेश बिडवे, अंकुश बिडवे, संदेश माडे, अजित लोकरे, अब्दुल समद काझी, चंद्रशेखर चरकपल्ले सर्व प्राध्यापकवृंद व शिक्षकेत्तर कर्मचारी यांच्या उपस्थितीत संस्थेच्या वतीने सत्कार करून अभिनंदन करण्यात आले.

## छत्रपती शाहू महाराजांच्या १५१ व्या जयंतीनिमित्त समतेचा जागर; 'राजर्षी शाहू महोत्सवा'त रंगणार कला-शौर्या चे प्रदर्शन

**पुणे/प्रतिनिधी** : आरक्षणाचे जनक,बहुजनांचे कैवारी, समता, बंधुता यांची शिकवण देणारे, लोकराजे राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या १५१ व्या जयंती निमित्त बहुजन समाज पक्ष,पश्चिम झोन च्या वतीने छत्रपतींची 'शाहूनगरी' कोल्हापूर येथे भव्यदिव्य कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.शाहूनगरीतील इर्विन मल्टीपर्पज सभागृहात गुरुवारी, २६ जून रोजी मुख्य सोहळा आयोजित करण्यात आला आहे. पक्षाचे राष्ट्रीय समन्वयक आणि महाराष्ट्राचे मुख्य प्रभारी,माजी खासदार मा.राजाराम जी यांच्या प्रमुख उपस्थितीत,प्रदेश अध्यक्ष ॲड. सुनील डोंगरे यांच्या अध्यक्षतेखाली, प्रदेश महासचिव आणि पश्चिम महाराष्ट्र झोन मुख्य प्रभारी डॉ.हुलगेश चलवादी यांच्या वतीने कार्यक्रम आयोजित करण्यात आला असल्याची माहिती बसप ने निवेदनातून दिली आहे.

छत्रपतींच्या जयंतीनिमित्त सकाळी ९ वाजता बिंदू चौक येथील महामानव महात्मा ज्योतीराव फुले आणि भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यावर पक्षाचे राष्ट्रीय समन्वयक आणि महाराष्ट्राचे मुख्य प्रभारी माजी खासदार राजाराम जी यांच्या हस्ते पुष्पमाला अर्पण केली जाईल. विशेष म्हणजे डॉ.बाबासाहेब हयात असतांना मराठा समाजाकडून हा पुतळा उभारण्यात आला होता. ऐतिहासिक बिंदू चौकातून भव्य मिरवणूक काढत लेझीम,ढोल-ताशांच्या गजरात महोत्सवाची सुरुवात होईल.

# योग संगम २०२५ : लातुरमध्ये उत्साहात साजरा झाला आंतरराष्ट्रीय योग दिनाचा विशेष सोहळा



**लातूर/प्रतिनिधी** : किडझी इन्फो पार्क स्कूल, पेठ, लातूर येथे २१ जून २०२५ रोजी आंतरराष्ट्रीय योग दिनाचे औचित्य साधून 'योग संगम' या विशेष सिग्नेचर कार्यक्रमाचे उत्साहात आयोजन करण्यात आले. हा कार्यक्रम मोरारजी देसाई राष्ट्रीय योग संस्थान (चऊछखध), नवी दिल्ली (आयुष मंत्रालय, भारत सरकार) आणि महाराष्ट्र योग व प्राकृतिक चिकित्सा आयुर्विज्ञान परिषद प्रणव निसर्गोपचार व योग केंद्र, नंदनवन कॉलनी, लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने पार पडला.

या विशेष योग उपक्रमात १००० पेक्षा अधिक विद्यार्थी, शिक्षक, कर्मचारी व पालकांनी सहभाग नोंदवून कार्यक्रमाची शोभा वाढवली. कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलनाने करण्यात आली. या उद्घाटन सोहळ्यात किडझी इन्फो पार्क स्कूलच्या संस्थापिका व मुख्याध्यापिका श्रीमती प्रीती शहा, सामाजिक कार्यकर्ते श्री. उमाकांत पंचाक्षरी, डॉ. किरण सगरे पाटील (अध्यक्ष, महाराष्ट्र योग व प्राकृतिक चिकित्सा आयुर्विज्ञान परिषद, लातूर) आणि डॉ. सृष्टी पांचाक्षरी-सगरे पाटील उपस्थित होते.

उद्घाटनानंतर विद्यार्थ्यांनी संगीतमय योग मनोऱ्यांचे सुंदर प्रात्यक्षिक सादर केले. त्यानंतर डॉ. सृष्टी पांचाक्षरी-सगरे पाटील यांनी मंचावरील सर्व मान्यवर व विद्यार्थ्यांसमवेत कॉमन योगा प्रोटोकॉलनुसार सामूहिक योग सत्र घेतले. त्यांनी आपल्या भाषणात योग ही भारतीय जीवनशैलीचा अविभाज्य भाग असल्याचे सांगत, योगाचे महत्त्व समाजाच्या सर्व स्तरांपर्यंत पोहोचवण्याचे आवाहन केले.

डॉ. किरण सगरे पाटील यांनी यावर्षीच्या 'एक पृथ्वी, एक स्वास्थ्य' या थीमवर भाष्य करताना सांगितले की, योगामुळे माणूस केवळ स्वतःपुरता मर्यादित राहत नाही तर तो कुटुंब, समाज, देश आणि पर्यावरण यांच्याशी जोडला जातो. योग ही एकात्मतेकडे नेणारी वाट आहे, असे त्यांनी स्पष्ट केले.

श्रीमती प्रीती शहा यांनी आपले मनोगत व्यक्त करताना सांगितले की, योग फक्त शारीरिक व्यायाम नसून जीवनमूल्यांची शिकवण देणारी पद्धती आहे. त्यामुळे योगाचे आचरण ही जगभरातील गरज बनली आहे.

या कार्यक्रमात शिक्षक अजित बजाज, राठोड मॅडम, संगीता मॅडम, ज्योती मॅडम, आकाश मोहिते सर यांची उपस्थिती लाभली. कार्यक्रमाचे उत्कृष्ट सूत्रसंचालन नूतन पाटील आणि नयना पाटील यांनी केले. आभार प्रदर्शन ॲड. रामेश्वर सगरे पाटील यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी संस्थेतील कर्मचारी व योग प्रशिक्षकांचे मोलाचे सहकार्य लाभले.

कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने झाली. 'योग संगम २०२५' हे लातूरसारख्या जिल्ह्यात योगप्रसारासाठी एक महत्त्वपूर्ण पाऊल ठरले आहे.

# 'केशवराज'मध्ये आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा

**लातूर/प्रतिनिधी** : येथील केशवराज मा. विद्यालय, लातूर येथे आज दि. २१ जून २०२५ रोजी 'आंतरराष्ट्रीय योग दिन' उत्साहात साजरा करण्यात आला. याप्रसंगी मंचावर भारतीय शिक्षण प्रसारक संस्था, अंबाजोगाई केंद्रीय कार्यकारिणी सदस्य तथा कार्यक्रमाचे अध्यक्ष मा. श्री संजय गुरव, प्रमुख पाहुण्या तथा योग शिक्षिका मा. डॉ. प्रणिता चाकूरकर, डॉ. आराधना औरादे, योगशिक्षक मा. श्री जगन्नाथ चिताडे, श्री केशवराज मा. विद्यालय, लातूर शालेय समिती सदस्य मा. श्री नरेंद्र पाठक, विद्यालयाचे मुख्याध्यापक मा. श्री बालासाहेब केंद्रे तसेच विद्यासभा संयोजक तथा उपमुख्याध्यापक मा. श्री महेश कस्तुरे यांची उपस्थिती होती. मंचावरील मान्यवरांच्या हस्ते सरस्वती मातेच्या प्रतिमेचे पूजन करून या कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.





याप्रसंगी कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या डॉ. प्रणिता चाकूरकर योगाचे महत्त्व सांगताना असे म्हणाल्या, की शरीर, मन व बुद्धीचे एकरुपीकरण म्हणजे योग होय. योगामध्ये व्यक्तीमधील रजोगुण व तमोगुण कमी करण्याची शक्ती आहे, त्यामुळे सातत्याने योगासन केले पाहिजेत. योग करताना श्वास, चेहऱ्यावरील हास्य, शरीरातील अवयवांना पडणारा ताण याकडे विशेष लक्ष द्यावे, असे त्यांनी सांगितले.

याप्रसंगी विशेष उपस्थित असलेले योगशिक्षक मा. ड. जगन्नाथ चिताडे यांनी शरीर व मन निरामय राहावे, यासाठी योगाची आवश्यकता असते. नित्यनियमाने योग करण्याने रक्ताभिसरण चांगले होते, असे सांगितले. अध्यक्षीय समारोपात मा. श्री संजय गुरव यांनी योग दिनाचे महत्त्व प्रतिपादन केले. २१ जून या दिवसाचे विशेष महत्त्व सांगितले. नित्यनियमाने योगसाधना करावी, असे सर्वांना आवाहन केले.

याप्रसंगी डॉ. आराधना औरादे यांनी योगासन आणि प्राणायामाची प्रात्यक्षिके दाखवली. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक, परिचय व स्वागत श्री मन्मथ कासनाळे यांनी केले. सूत्रसंचालन व आभारप्रदर्शन श्रीमती स्मिता मेहकरकर यांनी केले. श्रीमती कांचन तोडकर यांच्या कल्याण मंत्राने कार्यक्रमाची सांगता झाली. या कार्यक्रमासाठी विद्यालयातील विद्यार्थी, पाचवी ते दहावी विभागातील सर्व शिक्षक, शिक्षिका यांची उपस्थिती होती.

या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी मुख्याध्यापक मा.श्री बाळासाहेब केंद्रे यांच्या मार्गदर्शनाखाली पर्यवेक्षक श्री बबन गायकवाड, श्रीमती राजश्री कुलकर्णी, श्रीमती इंदू ठाकुर, श्रीमती अंजली निर्मळे, श्री राम जोशी तसेच कार्यक्रम प्रमुख तथा बलोपासक मंडळ प्रमुख श्री प्रयागराज गरुड, श्री गुरुनाथ झुंजारे, व्यवस्थेतील सर्व शिक्षक यांनी परिश्रम घेतले.

प्रो. जडे यांचे रबरी शिक्के
कॉम्प्युटर नॉयलॉन रबर असलेले
टिकाऊ रबरी शिक्के
तयार करून मिळतील.
शाखा १.
जडे-भारत प्रिंटींग प्रेस, मेनरोड, लातूर
शाखा २.
जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्र नगर, लातूर
संपर्क: (०२३८२) २४२६०८,२४५४०९



# तुळजाभवानी अभियांत्रिकी महाविद्यालयात ३०० तासांची कार्यशाळा



तुळजापूर(प्रतिनिधी)- तुळजाभवानी अभियांत्रिकी महाविद्यालयात 'जावा आणि फुल स्टॅक डेव्हलपमेंट' विषयावरील ३०० तासांची कार्यशाळा संपन्न झाली. या कार्यशाळेत संगणक आणि इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन विभागातील तृतीय वर्षातील ९२ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला.

पुण्याचा 'सिंबॉयसिस स्किल युनिव्हर्सिटी आणि 'कॅपजेमिनी' या सॉफ्टवेअर कंपनीच्या संयुक्त विद्यमाने आयोजित कार्यशाळेत प्रशिक्षणासाठी महेंद्रनाथ यादव आणि नंदन गौरीशंकर आदींची प्रशिक्षक म्हणून उपस्थिती होती. या प्रशिक्षणात महाविद्यालयातील संगणक आणि इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन विभागातील तृतीय वर्षातील ९२ हून अधिक विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला.

कार्यशाळेचा समारोप महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ओमप्रकाश राजनकर यांचा उपस्थितीत पार पडला. या वेळी संगणक विभागप्रमुख प्रा. जे. एम. शेख, इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन विभागप्रमुख प्रा. व्ही. व्ही. पतंगे, प्रा. डी. जे. वाघमारे आदींची प्रमुख उपस्थिती होती. या कार्यशाळेमुळे विद्यार्थ्यांना नवीन तंत्रज्ञान आत्मसात करण्यास मिळाले असून यामुळे नामांकित सॉफ्टवेअर कंपन्यांमध्ये नोकरीच्या संधी उपलब्ध होणार आहे. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. संतोष एकदंत यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी महेश नवगिरे, नितीन कुलकर्णी आदींनी परिश्रम घेतले.

# शिक्षक हा सुसंस्कृत समाज घडवणारा शिल्पकार आहे–विनायकराव पाटील



उमरगा(प्रतिनिधी)- शिक्षक हा सुसंस्कृत समाज घडवणारा शिल्पकार आहे. समाजातील विविध क्षेत्रांची शिक्षकांमुळेच जडणघडण होते. शिक्षकांच्या सेवा कालावधीत शिक्षकांना विद्यार्थी व पालकांच्या भविष्याचा अचूक वेध घेता येतो.

शिक्षकांनी उत्कृष्ट विद्यार्थी घडवण्यासाठी आयुष्य समर्पित केलेले असते. ज्ञान, अनुभवाचा उपयोग समाजहितासाठी करावा. सेवानिवृत्तीनंतरही समाजाचे शिक्षक म्हणून सेवा करावी, असे प्रतिपादन श्रमजीवी शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष तथा ज्येष्ठ समाजसेवक विनायकराव पाटील यानी केले. आदर्श महाविद्यालयाचे प्रा. डॉ. अनुराधा मिरगणे, कार्यालयीन अधीक्षक दिलीप माने, ग्रंथालय सहा. राजेंद्र पतगे सेवापूर्ती समारंभानिमित्त संस्थाध्यक्ष विनायकराव पाटील बोलत होते. संस्था संचालक मल्लिनाथ दंडगे, प्रभारी प्राचार्य डॉ. राम सोलंकर, प्राचार्य डॉ. विजयकुमार सरपे, प्राचार्य सैफन शेख, उपप्राचार्य राम माळगे आदी उपस्थित होते. पाटील म्हणाले की, शिक्षण संस्थेत कार्यरत शिक्षक व कर्मचारी हे एकाच कुटुंबातील सदस्य असतात. चारित्र्यसंपन्न शिक्षकांमुळेच शिक्षण संस्थांचा नावलौकिक वाढतो. संस्थाचालक हे शिक्षक व कर्मचाऱ्यांचे पालक असतात. शिक्षक हे विद्यार्थी घडवणारे आधारस्तंभ असतात. शिक्षकांमुळे समाजाची सर्वांगीण प्रगती होते. चारित्र्यसंपन्न शिक्षक, कर्मचारी मिळणे त्या–त्या शिक्षण संस्थेचे भाग्य असते. श्रमजीवी शिक्षण संस्थेला मेहनती, निरपेक्ष, निष्कलंक, प्रामाणिक शिक्षक कर्मचारी मिळाले आहेत. आदर्श कनिष्ठ महाविद्यालय, श्रमजीवी कर्मचारी सह. पतसंस्था, श्रमजीवी अध्यापक विद्यालय व महाविद्यालय, श्रमजीवी फार्मसीच्या वतीने व सामाजिक संस्थांच्या वतीने सेवापूर्ती सत्कार करण्यात आला. प्रभारी प्राचार्य डॉ. राम सोलंकर यांनी डॉ. अनुराधा मिरगणे, दिलीप माने राजेंद्र पतगे यांनी सेवा कालावधीत केलेल्या शैक्षणिक व सामाजिक कार्याचे कौतुक केले.

**पुन्हा पुन्हा उगवणारा सूर्य विकासाची पहाट घेऊन येतो**

उगवणारा सूर्य मावळत असतो तर पुन्हा–पुन्हा उगवणारा सूर्य नव्या विकासाची पहाट घेऊन उगवतो. शिक्षकांनी आयुष्यातील शैक्षणिक अनुभव व ज्ञानाचा उपयोग उत्कृष्ट समाजनिर्मितीसाठी करावा. आदर्श महाविद्यालयाच्या वतीने सेवापूर्तीबद्दल डॉ. अनुराधा मिरगणे, कार्यालयीन अधिक्षक दिलीप माने, ग्रंथालय सहाय्यक राजेंद्र पतगे यांचा सपत्नीक सत्कार केला.

# भवानी रोडवरील लोखंडी अँगलचा सांगाडा धोकादायक

तुळजापूर(प्रतिनिधी)–मंदिर संस्थानने भवानी रोडवर सावलीसाठी लावण्यात आलेले पडदे अनेक ठिकाणी फाटले असून लोखंडी अँगलचा सांगाडा धोकादायक बनला आहे. पोलिसांचे टेहळणी टॉवर कोसळल्याचा घटनेचा पार्श्वभूमीवर मंदिर संस्थानने धोकादायक लोखंडी अँगल तातडीने काढून घेण्याची मागणी होत आहे.

तुळजाभवानी मंदिर संस्थानच्या वतीने उन्हाळ्यात सावलीसाठी महाद्वार परिसरासह भवानी रोड वर सावलीची सोय करण्यात आली होती. यासाठी लोखंडी अँगलच्या सहाय्याने सांगाडा उभारण्यात आला होता. मात्र वादळी वाऱ्यासह झालेल्या पावसाने सावलीचा पडदा फाटला आहे तर लोखंडी अँगलचा सांगाडा धोकादायक बनला आहे. मंदिर संस्थानने तातडीने धोकादायक लोखंडी अँगलचा सांगाडा तातडीने काढून घेण्याची गरज व्यक्त करण्यात येत आहे.

**टॉवर कोसळल्याची घटना ताजी**

शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकातील पोलिसांचे टेहळणी टॉवर भाविकांचा वाहनावर कोसळल्याची घटना ताजी असल्याने मंदिर संस्थान ने सावलीसाठी बसवण्यात आलेला लोखंडी अँगल चा सांगाडा काढण्याची मागणी होत आहे. टेहळणी टॉवर कोसळल्याचा घटनेत भाविकांचा वाहनाचे नुकसान झाले होते.

# धाराशिव जिल्ह्यात संकल्प ते सिद्धी अभियान,दुसऱ्या आठवड्यातही जनता दरबारास उत्स्फूर्त प्रतिसाद!



धाराशिव (प्रतिनिधी)- – पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकारच्या ११ वर्षांच्या यशस्वी कार्यकाळानिमित्त भाजपच्या 'संकल्प ते सिद्धी' अभियानांतर्गत धाराशिव जिल्ह्यातील विविध तालुक्यांत सलग दुसऱ्या रविवारीही 'जनता दरबार' उपक्रम राबवण्यात आला. २२ जून रोजी सकाळी १० ते १ या वेळेत नागरिकांच्या अडचणी ऐकून त्यांचे समाधानकारक निराकरण करण्यासाठी भारतीय जनता पार्टीच्या वतीने विविध ठिकाणी जनता दरबार आयोजित करण्यात आले. या उपक्रमात मोठ्या प्रमाणावर नागरिकांचा सहभाग पाहायला मिळाला. असंख्य तक्रारी लेखी व तोंडी स्वरूपात मांडण्यात आल्या, त्यातील अनेक तक्रारींचे निवारण दरबारातच करण्यात आले. या संपूर्ण उपक्रमाचे मार्गदर्शन आमदार राणाजगजितसिंह पाटील व माजी आमदार सुजितसिंह ठाकूर यांचे लाभले होते. त्यांच्या सूचनांनुसार आणि भाजपा जिल्हा संघटनाच्या नियोजनातून भाजपा जिल्हाध्यक्ष दत्ताभाऊ कुलकर्णी यांनी जिल्हाभरात जनता दरबारचे यशस्वी आयोजन करण्यात आले. नायगाव येथे दत्ताभाऊ साळुंखे यांच्या संयोजनात अस्मिता कांबळे यांच्या उपस्थितीत, आंबेजवळगा येथे अनिल भुतेकर यांच्या अध्यक्षतेखाली अॅड. दत्तात्रय देवळकर प्रमुख उपस्थित, पाडोळी येथे निलकंठ पाटील यांच्या संयोजनात नितीन काळे उपस्थित तसेच काक्रंबा येथे महादेव जाधव यांच्या आयोजकत्वाखाली अॅड. खंडेराव चौरे प्रमुख उपस्थित, तर इटकळ–केशेगाव येथे रंजना राठोड यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाध्यक्ष दत्ताभाऊ कुलकर्णी यांच्या प्रमुख उपस्थितीत जनता दरबार पार पडला.

या उपक्रमाच्या पहिल्या टप्प्यातही, १५ जून रोजी जिल्हाभरात घेण्यात आलेल्या जनता दरबारांना उत्तम प्रतिसाद मिळाला होता. या माध्यमातून नागरिक आणि पक्ष यांच्यातील थेट संपर्क, जनतेच्या अडचणींवर त्वरित कृती, आणि प्रशासनातील समन्वय अधिक सशक्त होत असल्याचे पक्ष पदाधिकाऱ्यांनी नमूद केले.

'संकल्प ते सिद्धी' अभियानाचा उद्देश लोकाभिमुख शासन अनुभव देणे आहे. त्यातून गावपातळीवर थेट संवाद व निर्णय प्रक्रिया साध्य केली जात असल्याचे भाजपा जिल्हाध्यक्ष दत्ताभाऊ कुलकर्णी यांनी सांगितले.


**लातूर समाचार उस्मानाबाद**

**बातम्या,लेख व जाहिराती साठी संपर्क**

**9422472502**

**9175325708**


# बस दुरुस्तीमुळे विलंब:एसटी बसचे वेळापत्रक कोलमडले

धाराशिव(प्रतिनिधी)–येथील बस स्थानकातून सुटणाऱ्या लांब पल्ल्याच्या बससह ग्रामीण भागातील बसचे वेळापत्रक कोलमडले आहे. शनिवारी रात्री १० वाजता सुटणारी धाराशिव–पुणे बस अर्धा तास उशिरा धावली. यामुळे प्रवाशांनी संताप व्यक्त केला.

धराशिव–लातूर, सोलापूर, तुळजापूर–नाशिक, धाराशिव–शिंगोली रेल्वे स्टेशनसह बेंबळी, धाराशिव–वैराग या फेऱ्याही उशिरा धावत आहेत. परंतु प्रवाशांच्या तक्रारींकडे एसटीचे वरिष्ठ अधिकारी दुर्लक्ष करत आहेत. शनिवारी, रविवारी पुणे मार्गावर प्रवाशांची अधिक गर्दी झाली होती. धाराशिव–पुणे बसमध्ये तांत्रिक बिघाड झाला होता, असे कारण देण्यात आले. दररोज निरनिराळी कारणे दिली जात असल्याने प्रवासी त्रस्त आहेत. धाराशिव–पुणे, धाराशिव– मुंबई, बीड–सोलापूर, धाराशिव–ठाणे, बोरिवली या लांब पल्याच्या प्रवाशांना अधिकचे तिकिट मोजूनही वेळेवर बस सुटत नाहीत.

# दोघांच्या मोटारसायकलची चोरी गुन्हा दाखल

लोहारा (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी शुभम शशीकांत लोभे, वय २५ वर्षे, रा. कानेगाव ता. लोहारा जि. धाराशिव यांची अंदाजे २०,००० काळ्या रंगाची शाईन मोटरसायकल ही दि. ०३.०६.२०२५ रोजी शुभम लोभे यांचे घरासमोरुन अज्ञात व्यक्तीने चोरुन नेली. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे–शुभम लोभे यांनी दि.२१.०६.२०२५ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन लोहारा पो ठाणे येथे भा.न्या.सं.कलम ३०३(२) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

कळंब (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी राजेंद्र प्रल्हाद समुद्रे, वय ५२ वर्षे, रा. बोरगाव खुर्द ता.कळंब१जि. धाराशिव यांची अंदाजे ३५,००० काळ्या रंगाची स्पेलंडर मोटरसायकल ही दि. २०.०६.२०२५ रोजी ११.०० वा. सु. तहसिल कार्यालयाच्या समोरील प्रांगणात कळंब येथुन अज्ञात व्यक्तीने चोरुन नेली. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे–राजेंद्र समुद्रे यांनी दि.२१.०६.२०२५ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन कळंब पो ठाणे येथे भा.न्या.सं.कलम ३०३(२) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

# शेतातून अल्युमिनियम तारेची चोरी

कळंब (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे : फिर्यादी नामे–रामहरी गुणवंत बंडगर, वय २९ वर्षे, रा. धारुर ता. जि. धाराशिव ह.मु. वाशी ता. वाशी जि. धाराशिव हे काम करत असलेल्या आनंदवाडी ईन्फ्रा प्रा. लि. कं. या कंपनीची मस्सा खं येथील शेत गट नं ७५१ मधील एक सिरेंटीका कंपनीची १९० मिटर लांबीची ल्युमिनीयम ईको ची केबल अंदाजे २०,००० किंमतीच अज्ञात व्यक्तीने दि. २०.०६.२०२५ रोजी ०६.०० वा. पुर्वी चोरुन नेली. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे–रामहारी बंडगर यांनी दि.२१.०६.२०२५ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन कळंब पो ठाणे येथे भा.न्या.सं.कलम ३०३(२) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

# जबरदस्तीने सोन्याच्या चैन लूटून झाले पसार

वाशी (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी नामे–दिपक भरत यादव, वय ३३ वर्षे, रा.धुनकवड ता. धारुर जि. बीड या दि. २०.०६.२०२५ रोजी १७.०० वा. सु. पारगाव टोलनाक्याचे पुढे दिपक यादव यांचे गळ्यातील ४ तोळे वजनाची सोन्याची चैन अंदाजे २,८०,००० किंमतीची अनोळखी दोन इसमांनी जबरीने लुटून पसार झाले. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे–दिपक यादव यांनी दि.२१.०६.२०२५ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन वाशी पो ठाणे येथे भा.न्या.सं.कलम ३०४(२), ३(५) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

# आदिवासी लाभार्थ्यांनी १५ जुलैपूर्वी ऑनलाईन अर्ज सादर करावेत: आदिवासी विकास विभागाचे आवाहन

धाराशिव दि.२३,(जिमाका):- आदिवासी विकास विभागामार्फत केंद्रवर्ती अर्थसंकल्प (न्युक्लीअस बजेट) अंतर्गत अनुसूचित जमातीसाठी वैयक्तिक व सामूहिक (बचतगट) योजनांचा लाभ देण्यासाठी ऑनलाईन अर्ज मागविण्यात आले आहेत.प्रकल्प अधिकारी,एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प सोलापूर यांनी धाराशिव जिल्ह्यातील पात्र लाभार्थ्यांना १५ जुलै २०२५ पर्यंत https://www.nbtribal.in या संकेतस्थळावर अर्ज सादर करण्याचे आवाहन केले आहे.

सदर योजनेसाठी अर्ज करताना संबंधित पुराव्याची कागदपत्रे अपलोड करणे आवश्यक आहे. अद्यापपर्यंत अर्जांची संख्या कमी असल्याने विभागाने पुन्हा एकदा आवाहन केले आहे.अर्ज प्रक्रियेमध्ये अडचण आल्यास सोलापूर येथील प्रकल्प कार्यालयात (सीटीओ इमारत, सात रस्ता) कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा.तसेच कार्यालयात माहिती सुविधा केंद्रामार्फत अर्ज भरून देण्याची मदतही उपलब्ध करून देण्यात आली आहे.

या योजनांचा लाभ घेण्यासाठी जास्तीत जास्त पात्र लाभार्थ्यांनी मुदतीत अर्ज सादर करावेत,असे आवाहन प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प,सोलापूर यांनी केले आहे.

## उस्मानाबाद शहरातील कांही महत्वाचे फोन नंबर

१) रुग्णवाहिका २२३९७६
२) रक्तपेढी २२३९७६
३) जिल्हा रुग्णालय २२६९२७
४) शहरपोलिस स्टेशन२४०९९९
५) अग्नीशामक विभाग २२२१०१
६) रेल्वेस्टेशन २४०९९९
७) एसपी कार्यालय २२७६२०
८) जिल्हाधिकारी का.२२४५०१
९) तहसिल का. २२७८८२
१०) जि.प. २२५४०७
११)नगरपरिषद २२५४०७
१२)जिल्हा माहिती अधिकारी ०२४७२-२२२७४४
१३) जिल्हा उद्योग केंद्र (डीआयसी) ०२४७२-२२२२२६
१४) उस्मानाबाद जिल्ह्याचे उपसंचालक ०२४७२-२२७८ ९ २
१५) उप विभागीय वन कार्यालय, उस्मानाबाद ०२४७२-२२३४०८
१६)अधीक्षक उत्पादन शुल्क कार्यालय ०२४७२-२२३३८७
१७) जिल्हा कल्याण अधिकारी ०२४७२-२२२०१४
१८) प्रादेशिक परिवहन अधिकारी (आरटीओ) ०२४७२-२२२५५५
१९) मुख्य पोस्ट ऑफिस ०२४७२-२२२२१४
२०) जिल्हा रोजगार अधिकारी ०२४७२-२२२२३६
२१) विभागीय नियंत्रक (एमएसआरटीसीसी) ०२४७२-२२२२१६
२२) लातूर समाचार ९४२२४७२५०२
बीडीओ, एम.आर.ए.जी.एस. जिल्हा परिषद ०२४७२-२२०६११
२३)मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२२६८४० २४)
२४) अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२५)
२२३३९७ प्रकल्प संचालक ०२४७१-२२१५५२
२५) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन) ०२४७२-२२३३८८
२६) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्राम पंचायत) ०२४७२-२२३३४३
२७) उप मुख्य कार्यकारी अधिकारी (स्त्री व मुल) ०२४७२-२२२५७०
२८) मुख्य खाते व वित्त अधिकारी ०२४७२-२२२१३२
२९) शिक्षण अधिकारी (प्राथमिक) ०२४७२-२२४१८४
३०) शिक्षण अधिकारी (माध्यमिक) ०२४७२-२२४१८४


हे पत्र मुद्रक,प्रकाशक, संपादक व मालक दयानंद शंकरराव जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर (महाराष्ट्र) येथे छापून समर्थनगर उस्मानाबाद येथे प्रकाशित केले. मो.नं.९४२२४७२५०२

Latur Samachar, Osmanabad Printed & Published by Jade Dayanand Shankarrao , Printed at Jade Offset Printers,Mitra Nagar Latur. and Published at Samarthnagar,Osmanabad. Editor : Jade Dayanand Shankarrao Mob:9422472502 RNI- MAHMAR/2003/11649